cmyk

## संपादकीय

### शिक्षण माफियांविरोधात निर्णायक लढ्याची वेळ

''विद्येचे माहेरघर'' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्याच्या नावाशी जर पेपरफुटी, गुणफुगवटा आणि शिक्षणातील भ्रष्टाचाराचे आरोप जोडले जात असतील, तर ती केवळ एका शहराची बदनामी नाही; ती महाराष्ट्राच्या वैचारिक परंपरेवर झालेली गंभीर जखम आहे. ज्ञान, प्रबोधन आणि सामाजिक परिवर्तनाच्या विचारांनी देशाला दिशा देणाऱ्या पुण्याने अनेक पिढ्यांचे भविष्य घडवले. मात्र आज त्याच पुण्याचे नाव नीट परीक्षेतील कथित गैरव्यवहारामुळे चर्चेत येत असेल, तर हा इशारा केवळ शिक्षण व्यवस्थेसाठी नाही,

दैनिक www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र वर्ष–६ अंक–६० बुधवार दि.२० मे २०२६ RNI No.: MAHMAR/2021/858 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–६ किंमत ३ रूपये

# कांद्याला २४ रुपयांचा दर द्या

## नाफेडने ८ ते १० लाख टन कांदा घ्यावा, रोहित पवारांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

नाशिक । प्रतिनिधी

**कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या मागण्यासंदर्भात राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. कांद्याला २४ रुपयांचा दर द्यावा अशी मागणी आम्ही त्यांच्याकडे केल्याचे आमदार रोहित पवार यांनी सांगितले. नाफेडने कांदा घेताना आठ ते दहा लाख टन कांदा घ्यावा. घेतलेला कांदा भारताच्या बाहेर निर्यात करावा अशी विनंती यावेळी केल्याचे रोहित पवार म्हणाले. आता साडेबारा रुपयांचा दर आहे, तो १६ रुपये करणार आहोत असे मुख्यमंत्र्यांनी सांगितल्याचे रोहित पवार यावेळी म्हणाले.**



पाऊस वेळेवर नाही आला तर आपल्याला काय करता येईल याबाबत समिती तयार करून त्यावर काम करणं आवश्यक आहे. यासंदर्भात एक समिती तयार केल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्याचे रोहित पवार म्हणाले. यावर्षी दहा ते बारा टक्के पाऊस कमी होईल असा अंदाज आहे. पाशा पटेल यांच्याशी देखील भेट झाली. कांद्याबाबतचे वास्तव त्यांच्याही कानावर टाकून चर्चा केली. पान २ वर

### आमदारांचा पगार कमी करायचा असेल तर कमी करा

आमदारांचा पगार कमी करायचा असेल तर कमी करा पण या छोट्या गोष्टी करून अडचणी सुटणार नाहीत असे रोहित पवार म्हणाले. शक्तिपीठ मार्गाची आज जरुरत नाही तो पैसा खर्च करण्यापेक्षा तसेच बुलेट ट्रेनचा खर्च कमी केला पाहिजे, असे ते म्हणाले.

## थोडक्यात...

### उमर खालिदची जामीन याचिका फेटाळली

नवी दिल्ली : दिल्लीच्या कडकडडुमा कोर्टाने जेएनयूचा माजी विद्यार्थी आणि दिल्ली दंगलीतील आरोपी उमर खालिदची अंतरिम जामीन याचिका फेटाळली आहे. आपल्या काकांच्या निधनानंतरचा ४० वा दिवस कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी त्याने ही याचिका दाखल केली होती. खालिदने आपल्या आजारी आईच्या शस्त्रक्रियेदरम्यान तिची देखभाल करण्यासाठी, तसेच गेल्या महिन्यात निधन झालेल्या आपल्या काकाच्या चेहल्लुम विधीमध्ये सहभागी होण्यासाठी १५ दिवसांच्या अंतरिम जामिनाची मागणी केली होती. दिल्ली पोलिसांनी या अंतरिम जामिनाला विरोध केला होता.

### देशाच्या ऊर्जा उद्दिष्टात महाराष्ट्र प्रयत्नशील

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताला संपन्न ऊर्जा राष्ट्र बनवून देशात शून्य कार्बन उत्सर्जन करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या उद्दिष्ट पूर्तीसाठी महाराष्ट्र पुरेपूर प्रयत्न करीत आहे. स्वच्छ ऊर्जा निर्मिती क्षेत्रात राज्यात येणारी गुंतवणूक ही देशाला संपन्न ऊर्जा राष्ट्र बनवण्यासाठी निश्चितच बळ देणारी ठरणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. राज्यात अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये गुंतवणूक करण्यास इच्छुक असलेल्या कंपन्यांना शासनाच्यावतीने संपूर्ण सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाहीही यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिली. मंत्रालयात आयोजित बैठकीत अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये राज्य शासनासोबत चार कंपन्यांचे सामंजस्य करार करण्यात आले.

### राजकीय टीका किंवा व्यंग म्हणजे देशद्रोह नव्हे

चेन्नई: लोकशाहीमध्ये राजकीय टीकेला तसेच कायदा–सुव्यवस्था समस्येवरील व्यंगाला देशद्रोह मानले जाऊ शकत नाही,'' असे निरीक्षण नोंदवत मद्रास उच्च न्यायालयाने विश्व हिंदू परिषदेच्या प्रादेशिक युनिटने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स वर टाकलेल्या अनेक राजकीय पोस्ट्स ब्लॉक करण्याच्या तामिळनाडू पोलिसांच्या आदेशाला अंतरिम स्थगिती दिली आहे. विश्व हिंदू परिषदेच्या एक्स हॅंडलवरील माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० च्या कलम ७९(३)(ब) आणि आयटी नियम, २०२१ च्या नियम ३(१)(ड) अंतर्गत ला अनेक यूआरएल काढून टाकण्याचे किंवा ब्लॉक करण्याचे आदेश तामिळनाडू पोलिसांनी दिले होते. ८ मे रोजी जारी केलेल्या नोटिसीला उत्तर म्हणून तामिळनाडू विश्व हिंदू परिषदेचे अध्यक्ष पी. चोकलिंगम यांनी याचिका दाखल केली होती.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१९ मे २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ११६.०० क्विंटल | २,१८१ | २,५१० | २,३१६ |
| ज्वारी/हायब्रिड: १३७.५० क्विंटल | १,९५० | ४,२०० | २,५६५ |
| मका/लोकल: ११४.५० क्विंटल | १,७९२ | १,९०० | १,८५२ |
| तूर : १७.०० क्विंटल | ६,८०० | ७,४०० | ७,१९२ |
| उडीद : ३.५० क्विंटल | ५,५०१ | ६,१०० | ५,८६७ |
| बाजरी: ६२.०० क्विंटल | १,६७१ | २,६२१ | २,१९५ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: २०.०० क्विंटल | ५,६२५ | ५,६२५ | ५,६२५ |
| हरभरा: ६.५० क्विंटल | ४,७०० | ५,५०० | ४,८२६ |

# क्रिमीलेअर मर्यादा ८ लाखांवरून १५ लाख करण्याची शिफारस, ४३ नव्या जातींच्या समावेशाचा प्रस्ताव

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील ओबीसी समूदायासाठी एक महत्त्वाची बातमी समोर येत आहे. ओबीसी नॉन क्रिमीलेअर मर्यादा ८ लाखांवरून १५ लाख करण्याची शिफारस करण्यात आली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली उपसमितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. यावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत लवकरच बैठक आयोजित करण्यात येणार आहे.**

याचसोबत ओबीसी समूदायात ४३ नव्या जातींच्या समावेशासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवण्याचा निर्णयही ओबीसी उपसमितीच्या



बैठकीत घेण्यात आला. ओबीसी जात पडताळणीच्या प्रलंबित प्रकरणांवर तातडीने निर्णय घ्यावा असे निर्देशही देण्यात आले आहेत. ओबीसी उपसमितीच्या बैठकीत ओबीसी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सवलतींवरही चर्चा करण्यात आली. चुकीच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप देऊ नयेत अशा सूचनाही देण्यात आल्या. ओबीसी समाजाच्या उन्नतीसाठी शैक्षणिक सक्षमीकरण आणि आर्थिक उन्नतीच्या विविध योजना राज्य शासन प्रभावीपणे राबवत आहे. राज्य शासनाने स्वतंत्र इतर मागास बहुजन कल्याण विभागाची स्थापना करून ओबीसी, विजाभज, एसबीसी आणि इतर मागास घटकांसाठी विविध कल्याणकारी योजनांना गती दिली आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, परदेशी शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य तसेच उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना १०० टक्के फी सवलत देण्यात येत असल्याचं मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. ओबीसी विभागामार्फत आश्रमशाळा चालविण्यात येत असून ग्रामीण आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली पान २ वर

# मोदींनी देशाची आर्थिक घडी विस्कटली!

## कठीण काळे यतोय, राहुल गांधींचा इशारा



रायबरेली । वृत्तसंस्था

**देशातील इंधन दरवाढीच्या मुद्द्यावरून लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मंगळवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार निशाणा साधला. ''देशावर लवकरच मोठं आर्थिक संकट ओढवणार असून आगामी काळ अत्यंत कठीण असेल,'' असा इशारा राहुल गांधी यांनी दिला आहे. तेल कंपन्यांनी सलग दुसऱ्यांदा केलेल्या दरवाढीनंतर त्यांनी सरकारला धारेवर धरले.**

रायबरेली दौऱ्यादरम्यान माध्यमांशी बोलताना कॉंग्रेस नेते राहुल गांधी म्हणाले की, ''देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी कठीण काळ येत आहे. कोणतीही ठोस कृती करण्याऐवजी पंतप्रधान मोदी लोकांना परदेश दौरे न करण्याचा सल्ला देत आहेत. मोदींनी देशाची आर्थिक घडी विस्कटून टाकली आहे. मी गेल्या काही दिवसांपासून सातत्याने सांगतोय की देशावर आर्थिक संकट घोंघावतेय. त्यांची 'अदानी–अंबानी' केंद्रित रचना फार काळ टिकणार नाही; ती कोसळेल. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे, याचा फटका मात्र सामान्य माणसाला बसेल,'' असे राहुल गांधी म्हणाले. राहुल गांधी यांनी पंतप्रधानांच्या परदेश दौऱ्यांवरूनही टीका केली. ते म्हणाले की, या आर्थिक धक्क्याचा परिणाम अदानी, अंबानी किंवा मोदींवर होणार नाही, तर तो सामान्य पान २ वर

# राज्यात महिनाभर पुरेल इतकाच इंधनसाठा?

## मंत्री भुजबळांच्या विधानाने वाढली चिंता

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यात इंधन टंचाईच्या चर्चांदरम्यान अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या एका विधानाने नागरिकांची चिंता वाढली आहे. ''राज्यात सध्या महिनाभर पुरेल इतकाच इंधनसाठा उपलब्ध आहे,'' असे भुजबळ यांनी म्हटल्याने पेट्रोल–डिझेल पुरवठ्याबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत.**

गेल्या काही महिन्यांपासून पश्चिम आशियातील तणावाचा परिणाम जागतिक इंधन बाजारावर होत आहे. विशेषतः अमेरिका–इराण चर्चेत प्रगती न झाल्याने होर्मुझ सामुद्रधुनीतील परिस्थिती अजूनही तणावपूर्ण आहे. याचा परिणाम कच्चे तेल, नैसर्गिक वायू आणि एलपीजीच्या दरांवर




झाला असून आंतरराष्ट्रीय बाजारात मोठी वाढ झाली आहे. महाराष्ट्रातील अनेक भागांत पेट्रोल आणि डिझेल पुरवठा विस्कळीत झाल्याचे चित्र दिसत आहे. काही पेट्रोल पंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून अनेक ठिकाणी 'नो स्टॉक'चे फलक झळकत आहेत. इंधनासाठी पान २ वर

# निट पेपरफुटी प्रकरण : शिवराज मोटेगावकर यांच्या मुलाची चौकशी

## देशभरात छापेमारी सुरू, लाभार्थी विद्यार्थी पालक यांचीही चौकशी

लातूर । प्रतिनिधी

देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या 'नीट' पेपरफुटी प्रकरणाच्या तपासाचे धागेदोरे आता अधिक गडद झाले आहेत. केंद्रीय अन्वेषण विभागाने या प्रकरणी लातूरमधील प्रसिद्ध 'आरसीसी' कोचिंग क्लासवर पुन्हा एकदा मोठी कारवाई केली आहे. आरसीसी क्लासचे संचालक प्रा.शिवराज मोटेगावकर यांच्या कुटुंबापर्यंत चौकशी पोहोचली आहे. मोटेगावकर यांच्या बारावीत शिकणाऱ्या आणि यंदा नीट परीक्षा दिलेल्या मुलाची सीबीआयने लातूरमध्ये कसून चौकशी केली. त्यानंतर मंगळवारी त्याला पुणे येथील सीबीआय कार्यालयात बोलावण्यात आले.




सोमवारी सीबीआयच्या एका विशेष पथकाने आरसीसी क्लासमध्ये अचानक दाखल होत झाडाझडती सुरू केली. या कारवाईदरम्यान क्लासमधील विविध महत्त्वाचे दस्तऐवज, कागदपत्रे आणि शैक्षणिक साहित्याची कसून तपासणी करण्यात आल्याची पान २ वर

### नामांकित डॉक्टर सीबीआयच्या रडारवर

या प्रकरणात लातूरमधील तीन नामांकित डॉक्टरांचा सहभाग असल्याची जोरदार चर्चा सध्या शहरात सुरू आहे. याच अनुषंगाने मंगळवारी केंद्रीय अन्वेषण विभागाच्या पथकाने लातूरमध्ये मोठी कारवाई केली आहे. प्राथमिक माहितीनुसार, सीबीआयचे एक विशेष पथक लातूरमधील औसा रोड परिसरात असलेल्या एका नामांकित डॉक्टरच्या हॉस्पिटलमध्ये दाखल झाले. याठिकाणी अधिकाऱ्यांकडून संबंधित डॉक्टरची कसून चौकशी केली गेली आहे. या कारवाईमुळे वैद्यकीय आणि शैक्षणिक वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे.

# भटक्या कुत्र्यांबाबत सर्वोच्च न्यायालय गंभीरच

## सार्वजनिक ठिकाणची भटकी कुत्री हटवण्याच्या आदेशाच्या दुरूस्तीस नकार

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी (दि.१९ मे) भटक्या कुत्र्यांच्या व्यवस्थापनाबाबत निकाल सुनावला. नागरिकांचा सुरक्षेचा मूलभूत अधिकार आणि प्राण्यांचे कल्याण यांच्यात समतोल साधण्याशी संबंधित महत्त्वाच्या कायदेशीर प्रश्नांवरील निकालाकडे संपूर्ण देशाचे लक्ष वेधले होते. सर्वोच्च न्यायालयाने पान २ वर




### सार्वजनिक सुरक्षेला प्राधान्य

सर्वोच्च न्यायालयाने सार्वजनिक सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले. नोव्हेंबर २०२५ मध्ये, सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, रेल्वे स्थानके, बस डेपो आणि क्रीडा संकुले यांसारख्या संस्थात्मक क्षेत्रांतून भटक्या कुत्र्यांना हटवण्याचे निर्देश दिले होते. तसेच शिक्षण आणि आरोग्य संस्थांना कुंपण घालण्याचे आणि अशा भागातून पकडलेल्या कुत्र्यांना पुन्हा तिथे न सोडण्याचे आदेश दिले.

# राज्यातील पाणीस्त्रोत कोरडे पडू लागले १५ जिल्ह्यांत ७०६ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे अनेक भागांमध्ये पाणीटंचाईची समस्याअसून नागरिकांना पिण्याच्या पाण्याची कमतरता भासू नये यासाठी शासनाने विविध जिल्ह्यांत टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू ठेवला आहे. अहवालनुसार राज्यातील १५ जिल्ह्यांतील ६३३ गावे आणि १६५२ वाड्यांमध्ये एकूण ७०६ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. या टँकरमध्ये ३३ शासकीय तर ६६९ खासगी टँकरचा समावेश



आहे. वाढत्या तापमानामुळे विहिरी, बोअरवेल आणि लहान पाणीस्त्रोत कोरडे पडू लागल्याने अनेक ग्रामीण भागांमध्ये टँकर हा नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याचा प्रमुख आधार ठरत आहे.

ठाणे विभागात सर्वाधिक १७७ गावे आणि ५७२ वाड्यांमध्ये १५५ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. तर नाशिक विभागात १५६ गावे आणि ४४४ वाड्यांसाठी १५९ टँकर कार्यरत आहेत. पुणे विभागात १४५ गावे आणि ५७२ वाड्यांमध्ये १३१ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. छत्रपती संभाजीनगर विभागात १३८ गावे आणि ६४ वाड्यांसाठी एकूण २४४ टँकर कार्यरत असून राज्यातील सर्वाधिक टँकर या पान २ वर

# 'या' लाडक्या बहिणींवर कारवाई होणार; मंत्री आदिती तटकरेंचा थेट इशारा

मुंबई । प्रतिनिधी

राज्य सरकारच्या 'लाडकी बहीण' योजनेबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. या योजनेचा गैरफायदा घेणाऱ्या अपात्र लाभार्थींवर आता कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे. तसेच चुकीच्या पद्धतीने घेतलेली रक्कमही वसूल केली जाणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला.

एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलताना आदिती तटकरे म्हणाल्या की, योजनेतील लाभार्थींना ३१ डिसेंबरपर्यंत ई–केवायसी करण्यासाठी मुदत देण्यात आली होती. मात्र अनेक महिलांनी अद्याप ई–केवायसी पूर्ण केलेली नाही. त्यामुळे आता संबंधित विभागांकडून अशा लाभार्थी महिलांची




माहिती मागवण्यात आली असून त्यांनी ई–केवायसी का केली नाही, याची चौकशी केली जाणार आहे. ''काही महिलांनी योजनेचा गैरफायदा घेतला आहे. तसेच काही पुरुषांनीही या योजनेचा लाभ घेतल्याचे समोर आले आहे. अशा सर्वांवर कारवाई केली जाईल आणि त्यांच्याकडून लाभाची रक्कम परत वसूल केली जाईल,'' असे तटकरे यांनी स्पष्ट केले. त्याचबरोबर पात्र महिलांना योजनेपासून पान २ वर

cmyk

अग्रलेख

# शिक्षण माफियांविरोधात निर्णायक लढ्याची वेळ

''विद्येचे माहेरघर'' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्याच्या नावाशी जर पेपरफुटी, गुणफुगवटा आणि शिक्षणातील भ्रष्टाचाराचे आरोप जोडले जात असतील, तर ती केवळ एका शहराची बदनामी नाही; ती महाराष्ट्राच्या वैचारिक परंपरेवर झालेली गंभीर जखम आहे. ज्ञान, प्रबोधन आणि सामाजिक परिवर्तनाच्या विचारांनी देशाला दिशा देणाऱ्या पुण्याने अनेक पिढ्यांचे भविष्य घडवले. मात्र आज त्याच पुण्याचे नाव नीट परीक्षेतील कथित गैरव्यवहारामुळे चर्चेत येत असेल, तर हा इशारा केवळ शिक्षण व्यवस्थेसाठी नाही, तर संपूर्ण समाजव्यवस्थेसाठी धोक्याची घंटा आहे.

महाराष्ट्राने शिक्षणाला नेहमीच सामाजिक न्यायाचे माध्यम मानले. महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील वंचितांना उभारी दिली. लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या विचारवंतांनी शिक्षणाला परिवर्तनाचे शस्त्र बनवले. पुणे ही त्या परंपरेची भूमी आहे. देशभरातील लाखो विद्यार्थी डॉक्टर, अभियंता, संशोधक किंवा प्रशासकीय अधिकारी होण्याचे स्वप्न घेऊन पुण्याकडे आशेने पाहतात. स्पर्धा परीक्षा, दर्जेदार शिक्षण आणि गुणवत्तेची परंपरा यामुळे पुण्याला राष्ट्रीय पातळीवर विशेष स्थान मिळाले. परंतु आज जर त्याच शहरावर ''पेपरफुटीचे केंद्र'' असा शिक्का बसण्याची वेळ आली असेल, तर ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. नीट परीक्षा ही लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा निर्णायक टप्पा असते. ग्रामीण भागातील गरीब शेतकरी आपल्या मुलाला डॉक्टर बनवण्यासाठी जमीन गहाण ठेवतो. मध्यमवर्गीय पालक स्वतःच्या गरजा कमी करून कोचिंग क्लासेसची फी भरतात. विद्यार्थी दिवस-रात्र अभ्यास करून भविष्य घडवण्याचा प्रयत्न करतात. या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर जर काही पैशासाठी आणि प्रभावासाठी परीक्षा व्यवस्थेचा सौदा करणारे रॅकेट सक्रिय होत असतील, तर तो केवळ आर्थिक गुन्हा नाही; तो विद्यार्थ्यांच्या विश्वासाचा, मेहनतीचा आणि स्वप्नांचा खून आहे. या प्रकरणातील सर्वांत धक्कादायक बाब म्हणजे गैरव्यवहाराचे संभाव्य संघटित स्वरूप. काही कोचिंग क्लासेस, एजंट, तथाकथित शैक्षणिक सल्लागार आणि दलाल यांच्या नावांचा उल्लेख समोर येत आहे. यामुळे एक गंभीर प्रश्न उपस्थित होतो. एवढ्या मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार सुरू असताना प्रशासन आणि परीक्षा यंत्रणा नेमकी काय करत होती? परीक्षा केंद्रांवरील सुरक्षा, बायोमेट्रिक पडताळणी, सीसीटीव्ही नियंत्रण, प्रश्नपत्रिकांच्या वाहतुकीची व्यवस्था आणि निकाल विश्लेषण या सर्व पातळ्यांवर गंभीर त्रुटी असल्याचे स्पष्ट होत आहे. काही केंद्रांवरील संशयास्पद निकाल, अवास्तव गुण आणि त्यानंतर उघडकीस आलेली पेपरफुटीची साखळी हे सर्व संघटित शिक्षण माफियाच्या अस्तित्वाचे संकेत देतात. यापेक्षा अधिक संतापजनक बाब म्हणजे, शिक्षण क्षेत्रातील काही व्यक्तींनी या गैरव्यवहाराला प्रतिष्ठेचे स्वरूप दिले आहे. कोचिंग उद्योगातील कोट्यवधी रुपयांची उलाढाल, आकर्षक जाहिराती, ''टॉपर फॅक्टरी''चा प्रचार आणि राजकीय आश्रय यांच्या बळावर काही मंडळी स्वतःला कायद्यापेक्षा वरचे समजू लागली आहेत. शिक्षणाचा बाजार झाला की गुणवत्तेपेक्षा पैसा महत्त्वाचा ठरतो. त्यामुळेच आज अनेक पालक आणि विद्यार्थी ''मेहनतीपेक्षा संपर्क आणि पैशाला महत्त्व आहे का?'' असा प्रश्न विचारू लागले आहेत. हा प्रश्न केवळ शिक्षण क्षेत्रासाठी नाही, तर लोकशाही व्यवस्थेसाठीही धोकादायक आहे. या प्रकरणात आता केवळ चौकशी, निलंबन किंवा दिखाऊ कारवाई पुरेशी ठरणार नाही. दोषींना कठोर आणि उदाहरण ठरेल अशी शिक्षा झाली पाहिजे. गुन्हा सिद्ध झाल्यास संबंधितांवर दीर्घकालीन कारावास, मोठ्या आर्थिक दंडाची कारवाई आणि शैक्षणिक क्षेत्रातून कायमची हकालपट्टी झाली पाहिजे. शिक्षणाच्या नावाखाली विद्यार्थ्यांच्या भविष्याचा व्यापार करणाऱ्यांबद्दल कोणतीही सहानुभूती असू नये. कारण अशा गुन्हेगारांवर दया दाखवणे म्हणजे प्रामाणिक विद्यार्थ्यांवर अन्याय करणे होय. समाजातून आता कठोर कारवाईची मागणी वाढत आहे. ज्या संस्था किंवा ठिकाणांमधून अशा रॅकेटचे संचालन झाले, त्यांच्यावर आर्थिक आणि कायदेशीर कारवाई व्हावी, अशी भावना व्यक्त होत आहे. काहींनी बुलडोझर कारवाईचीही मागणी केली आहे. या मागणीमागील भावना समजून घेणे आवश्यक आहे. कारण जेव्हा सामान्य विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळले जाते, तेव्हा समाजात संताप निर्माण होणे स्वाभाविक आहे. कायद्याची भीती निर्माण झाली नाही, तर अशी रॅकेट पुन्हा उभी राहण्यास वेळ लागणार नाही. या प्रकरणात न्यायव्यवस्था आणि तपास यंत्रणांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. तपास निष्पक्ष, वेगवान आणि राजकीय दबावापासून मुक्त असणे गरजेचे आहे. महाराष्ट्र सरकारने या प्रकरणात कोणताही राजकीय हस्तक्षेप होऊ देणार नाही, असा ठोस संदेश द्यायला हवा. जर चौकशी लांबवली गेली, पुरावे कमकुवत केले गेले किंवा दोषींना संरक्षण दिले गेले, तर शिक्षण व्यवस्थेवरील लोकांचा विश्वास कोसळेल. शिक्षण ही केवळ सेवा नसून समाजाच्या भवितव्याची पायाभरणी आहे; त्यामुळे त्यातील भ्रष्टाचार हा राष्ट्राच्या भविष्यासाठी घातक ठरतो. या घटनेने शिक्षण क्षेत्राच्या वाढत्या व्यापारीकरणाचाही प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहे. स्पर्धा परीक्षांभोवती अब्जावधी रुपयांचा उद्योग उभा राहिला आहे. कोचिंग क्लासेस, रँकच्या जाहिराती, अवास्तव फी आणि ''यशाची हमी'' देणाऱ्या संस्थांमुळे शिक्षण हे ज्ञानाचे माध्यम न राहता व्यवहाराचे साधन बनत चालले आहे. पालकांची मानसिक असुरक्षितता आणि विद्यार्थ्यांवरील ताण यामुळे ही व्यवस्था अधिकच विकृत होत आहे. त्यामुळे केवळ पोलिसी कारवाई करून हा प्रश्न सुटणार नाही. संपूर्ण परीक्षा व्यवस्थेची तांत्रिक, प्रशासकीय आणि नैतिक पुनर्रचना करणे आवश्यक आहे. प्रश्नपत्रिकांची डिजिटल सुरक्षा, एन्क्रिप्टेड वितरण प्रणाली, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने निकालांचे विश्लेषण, स्वतंत्र देखरेख संस्था आणि परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता यांसारख्या उपाययोजना तातडीने राबवाव्या लागतील. तसेच कोचिंग उद्योगाचे नियमन, फी नियंत्रण आणि परीक्षा प्रक्रियेवरील सार्वजनिक विश्वास पुनर्स्थापित करण्यासाठी व्यापक धोरण आवश्यक आहे. शिक्षण क्षेत्रातील गैरव्यवहार रोखण्यासाठी कठोर कायदे आणि जलदगती न्यायप्रक्रिया हाही काळाची गरज आहे. पुण्याची ओळख ज्ञान, विवेक आणि सामाजिक प्रबोधनाची आहे. त्या शहराच्या नावाशी पेपरफुटीचा कलंक जोडला जाणे ही महाराष्ट्रासाठी अत्यंत वेदनादायक बाब आहे. हा डाग केवळ दोषींना शिक्षा करूनच धुतला जाऊ शकतो. महाराष्ट्राने यापूर्वी गुन्हेगारी, भ्रष्टाचार आणि सामाजिक अन्यायाविरोधात कठोर भूमिका घेतली आहे. आता शिक्षण माफियांविरोधातही तितक्याच निर्धाराने उभे राहण्याची वेळ आली आहे. कारण विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित राहिले, तरच समाजाचे भविष्य सुरक्षित राहील.

## खरीप २०२५ मधील प्रलंबित पीक विम्यासाठी २६ मे रोजी मुंबईत राज्यस्तरीय बैठक; धनंजय मुंडेंच्या मागणीनंतर हालचालींना वेग

मुंबई । प्रतिनिधी

**मागील वर्षी सन २०२५ मध्ये खरीप हंगामात प्रचंड अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे शेतीपिकांचे मोठे नुकसान झाले होते मात्र बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अद्याप पीकविमा मिळालेला नाही, याच पार्श्वभूमीवर माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या मागणीनुसार येत्या २६ तारखेला (मंगळवार) कृषी मंत्री दत्ता मामा भरणे यांच्या अध्यक्षतेखाली व आ. धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत मुंबईत बीड जिल्ह्यातील प्रलंबित पीक विम्याच्या प्रश्नी तोडगा काढण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले असून या बैठकीस कृषी विभाग, जिल्हा प्रशासन तसेच संबंधित विमा कंपनीचे राज्यस्तरीय अधिकारी उपस्थित राहणार आहेत.**

मागील वर्षी बीड जिल्ह्यात विशेषकरून खरीप हंगामाच्या शेवटी पिके काढणीच्या तोंडावर सातत्याने प्रचंड अतिवृष्टी, ढगफुटी व जिल्हाभर पूरपरिस्थिती निर्माण होऊन शेतीपिकांचे अतोनात नुकसान झाले होते, मात्र शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचा पीकविमा अद्याप मिळालेला नाही. विमा कंपन्यांचे धोरण आणि पीकविमा योजनेत झालेले बदल यामुळे पात्र असूनही बीड जिल्ह्यातील शेतकरी वंचित असून यावर तोडगा काढण्यासाठी राज्य शासन स्तरावर बैठक घेऊन तोडगा काढण्याची विनंती धनंजय मुंडे यांनी काही दिवसांपूर्वी पत्राद्वारे केली होती. त्यानुसार कृषिमंत्री दत्ता मामा भरणे यांच्या निर्देशानुसार कृषी विभागाने ही बैठक बोलावली आहे. धनंजय मुंडे हे स्वतः मागील काळात कृषीमंत्री असताना देशात मागील दहा वर्षांच्या इतिहासातील सर्वाधिक पीकविमा महाराष्ट्रात मंजूर करण्यात आला होता. विमा कंपन्यांच्या नफेखोरी तसेच निकषां जिल्हा परिषदेच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रभारी प्रकल्प संचालक पदाचा कार्यभार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव यांच्याकडे देण्यात आला आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी दि.१९ मे रोजी प्रभारी कार्यभार देण्याचा आदेश निर्गमित करण्यात आला आहे. जिल्हा ग्रामीण यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती संगीतादेवी पाटील या वैद्यकीय कारणामुळे रजेवर गेल्या आहेत. त्यामुळे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जाधव यांच्याकडे प्रभारी कार्यभार देण्यात आला आहे. जाधव हे शिस्तप्रिय आणि कर्तव्य कठोर असल्याने जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा आणि उमेद अभियानाच्या उपक्रमाला अधिक गती येईल, असा आशावाद व्यक्त करण्यात आला होता.

## पेंडगावात कृषिदूतांचा माती परीक्षण उपक्रम; वैज्ञानिक शेतीबाबत जनजागृती

पेंडगाव । प्रतिनिधी

**के.एस.के. कृषी महाविद्यालयाच्या कृषीदूतांनी १९ मे रोजी पेंडगाव येथे माती परीक्षण उपक्रम राबवून गावकऱ्यांमध्ये वैज्ञानिक शेतीबाबत जनजागृती केली. शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीची शास्त्रीय माहिती मिळावी, योग्य खतांचे नियोजन करता यावे आणि उत्पादनक्षमता वाढावी, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**

उपक्रमादरम्यान कृषीदूतांनी गावातील विविध शेतांमध्ये भेट देऊन मातीचे नमुने संकलित केले. या नमुन्यांच्या आधारे जमिनीतील पोषणतत्त्वांची उपलब्धता, पीएच मूल्य, सेंद्रिय कर्ब, वीज वहन क्षमता आदी घटकांची तपासणी करण्यात येणार असून त्यानुसार शेतकऱ्यांना पीकनिहाय शिफारसी दिल्या जाणार आहेत. यावेळी महाविद्यालयाचे सहसचिव डॉ. जी. व्ही. साळुंखे, प्राचार्य डॉ.



एस. पी. मोरे, समन्वयक प्रा. डी. बी. राठोड, कार्यक्रम अधिकारी प्रा. बी. आर. चादर तसेच प्रा. ए. जी. गार्डी यांचे मार्गदर्शन लाभले. माती परीक्षणाचे महत्त्वाचे फायदे कृषीदूतांनी यावेळी माती परीक्षणाचे महत्त्व स्पष्ट करताना पुढील फायदे सांगितले : जमिनीतील अन्नद्रव्यांची अचूक माहिती मिळते योग्य पीक निवडीस मदत होते खतांचा अचूक व संतुलित वापर करता येतो शेतीचा उत्पादन खर्च कमी होतो पीक उत्पादनात वाढ होते गावचे सरपंच सोमनाथ लक्ष्मण पवार यांनी कृषीदूतांच्या कार्याचे कौतुक केले. या उपक्रमात कृषीदूत अमित दळवी, ज्ञानेश्वर दरेकर, मिथुन आहेर, ऋषिकेश आगळे, गणेश भूसनार, कृष्णा चौरे, रवी चव्हाण, स्वप्नील बांगर, प्रविण बानोत व ऋतिक भांगरे यांनी माती संकलनात सहभाग घेतला. यावेळी चेअरमन सुखदेव घट तसेच शेतकरी लक्ष्मीकांत डोंगरे, कचरू डोंगरे, धर्मराज गाडे, सुरेश गाडे, नागेश घट, बळीराम काळकुटे, वैजनाथ धट, रामभाऊ काळकुटे आदी उपस्थित होते.

## एसीईओ जाधव यांच्याकडे डीआरडीए'चा अतिरीक्त कार्यभार

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रभारी प्रकल्प संचालक पदाचा कार्यभार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव यांच्याकडे देण्यात आला आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी दि.१९ मे रोजी प्रभारी कार्यभार देण्याचा आदेश निर्गमित करण्यात आला आहे.

जिल्हा ग्रामीण यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती संगीतादेवी पाटील या वैद्यकीय कारणामुळे रजेवर गेल्या आहेत. त्यामुळे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जाधव यांच्याकडे प्रभारी कार्यभार देण्यात आला आहे. जाधव हे शिस्तप्रिय आणि कर्तव्य कठोर असल्याने जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा आणि उमेद अभियानाच्या उपक्रमाला अधिक गती येईल, असा आशावाद व्यक्त करण्यात आला होता.

## यशस्वी व्हायचे असेल तर शॉर्टकट नव्हे, सातत्य व गुणवत्तेला प्राधान्य द्या-प्रा. विलास रोडे

परळी । प्रतिनिधी

**जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर कोणताही शॉर्टकट न शोधता विद्यार्थ्यांनी नेहमी गुणवत्तेला प्राधान्य दिले पाहिजे. मेहनत, सातत्य आणि गुणवत्तेप्रती असलेली बांधिलकी यांमुळेच यश संपादन करता येते, असे प्रेरणादायी प्रतिपादन भीमजयंती महोत्सव समितीचे प्रा. विलास रोडे यांनी केले.**

परळी भीमजयंती महोत्सव समिती आणि नालंदा फाउंडेशन बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. सोमवार सायंकाळी येथील लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिर येथे हा सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमास नालंदा फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे, सम्राट अशोक विचार मंचाचे संयोजक प्रा. दासू वाघमारे तसेच प्रा. राम गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना प्रा. विलास रोडे म्हणाले की, आज व्यवसायाभिमुख शिक्षणासह विविध क्षेत्रांत अनेक संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी कोणतेही क्षेत्र निवडले तरी त्यात सर्वोत्तम कामगिरी करण्याचा निर्धार ठेवावा. शिक्षणामुळे खरा माणूस घडतो आणि जीवनाला योग्य दिशा मिळते. सध्या शिक्षण क्षेत्रात काही प्रमाणात बोगसगिरी वाढत असली तरी विद्यार्थ्यांनी त्यामुळे निराश न होता, आपली गुणवत्ता सिद्ध करून तिचा गौरव वाढविण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे. याप्रसंगी प्रा. दासू वाघमारे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक शैक्षणिक प्रवासाचा संदर्भ देत विद्यार्थ्यांनी शिक्षण आणि जिद्दीच्या बळावर स्वतःची प्रगती साधावी, असे आवाहन केले. प्रा. प्रदीप रोडे म्हणाले की, वेळेचे महत्त्व न ओळखणारी व्यक्ती प्रगती करू शकत नाही. करिअर घडविताना वेळेचे अचूक नियोजन आवश्यक असून विद्यार्थ्यांनी मोबाईल व सोशल मीडियाचा मर्यादित वापर करावा. वयाच्या या टप्प्यावर काही वर्षे मनापासून मेहनत घेतल्यास भविष्य उज्ज्वल घडेल. यशासाठी गुणवत्ता, कौशल्य, प्रबळ इच्छाशक्ती आणि इंग्रजी संवादकौशल्य अत्यंत महत्त्वाचे असून बदलत्या जगासोबत स्वतःत सकारात्मक बदल घडवून आणण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी करावा, असे नमूद केले. या सोहळ्यात दहावी व बारावीतील प्रत्येकी प्रथम पाच गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मानचिन्ह, गौरव प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ आणि प्रेरणादायी पुस्तक देऊन विशेष गौरविण्यात आले. तसेच उपस्थित इतर सर्व यशस्वी विद्यार्थ्यांनाही पुष्पगुच्छ व पुस्तके भेट देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सिद्धार्थ जगतकर यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. नितीन व्हावळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन आयोजक समितीच्या वतीने करण्यात आले. या सोहळ्याला परळी शहर व परिसरातील विद्यार्थी, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मे २०२६ मध्ये पदवी पूर्ण करणाऱ्या पशुवैद्यकीय विद्यार्थ्यांना एमपीएससी पशुवैद्यकीय अधिकारी परीक्षेस पात्र करण्याची मागणी

मुंबई । प्रतिनिधी

**मे, २०२६ मध्ये पशु वैद्यकीय पदवी प्राप्त करून इंटर्नशिप करत आलेल्या विद्यार्थ्यांना राज्य लोकसेवा आयोगाच्या वतीने एप्रिल, २०२५ मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या पशु वैद्यकीय अधिकारी (गट - अ) या परीक्षेसाठी पात्र ठरवण्यात यावे, अशी विनंती माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. याबाबत सोमवारी सायंकाळी धनंजय मुंडे यांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती.**



२५ एप्रिल, २०२५ रोजी लोकसेवा आयोगाने पशु वैद्यकीय अधिकारी, महाराष्ट्र पशु संवर्धन सेवा, गट अ या पदासाठी २७९७ जागांची जाहिरात प्रसिद्ध केली होती, या जागांची परीक्षा येत्या ११ जून रोजी संपन्न होणार आहे. सदर जाहिरातीत २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात करत असलेल्या विद्यार्थ्यांची अर्हता पूर्ण नसल्याने त्यांना आयोगाकडे अर्ज करता येत नव्हता. मात्र राजस्थान लोकसेवा आयोगाने करत असलेल्या विद्यार्थ्यांना स्थानिक पशु चिकित्सा अधिकारी पदासाठी पात्र ठरवले असल्याचे महाराष्ट्र पशु वैद्यकीय विद्यार्थी संघटनेने धनंजय मुंडे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची सदर परीक्षा जून महिन्यात होणार असून, त्यापूर्वीच मे महिन्यात महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी आपली शैक्षणिक अर्हता पूर्ण केली असल्याने त्यांना या परीक्षेसाठी पात्र ठरवण्यात यावे, अशी विनंती धनंजय मुंडे यांनी केली असून, याच संदर्भात पशु संवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनाही पत्र देण्यात आले आहे. यावर मुख्यमंत्री महोदयांनी प्रकरण तपासून योग्य निर्णय घेण्याचे निर्देश संबंधित विभागाच्या सचिवांना निर्देश दिले आहेत.

## पान १ वरून...

**कांद्याला २४ रुपयांचा**

दोन प्रकारच्या अडचणी शेतकऱ्यांच्या कर्ज देण्याबाबत आहेत. शेतकऱ्यांकडे पैसे नाहीयेत, शेतकरी बाहेरून कर्ज घेऊन पैसे भरतात असे रोहित पवार म्हणाले. पण कर्जमाफी दिल्याबाबत कर्ज फेडायचे की नाही? ही दुविधा शेतकऱ्यांच्या समोर आहे. शेतकऱ्याला पावसाच्या आधी जर पैसा मिळाला नाही तर लागवड होणार नाही पेरणी होणार नाही असे रोहित पावर म्हणाले. शेतकऱ्याला जर अर्थसाह्य आता मिळालं नाही तर मोठ्या प्रमाणात अडचणी वाढू शकतील असे ते म्हणाले. नीटमध्ये जे जे आरोपी आहेत त्यांना अटक करावं याबाबतची मागणी देखील मुख्यमंत्र्यांकडे केल्याची माहिती रोहित पवार यांनी दिली. या अधिवेशनात शक्ती कायदा पारित व्हावा, लहान मुली बाबतचा हा कायदा पारित व्हावा. महाविकास आघाडीच्या काळात हा कायदा पास झाला होता पण केंद्रातून परत पाठवण्यात आल होतं. तो कायदा या अधिवेशनात पारित करावा अशी विनंती केली.

-----------

**मोदींनी देशाची आर्थिक**

माणसावर खोलवर परिणाम करेल. हा परिणाम अभूतपूर्व असेल. परिस्थिती गंभीर होत असताना उपाययोजना करण्याऐवजी मोदी लोकांना परदेश दौरे टाळण्याचा सल्ला देत आहेत, तर दुसरीकडे ते स्वतः मात्र परदेश दौऱ्यावर आहेत, असा टोला त्यांनी लगावला. अमेरिका आणि इराणमधील तणावामुळे जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत वाढ झाली आहे. या संघर्षामुळे जागतिक तेल वाहतुकीसाठी महत्त्वाचा असलेला स्ट्रेट ऑफ हार्मुजचा मार्ग विस्कळीत झाला आहे. जागतिक बाजारात किमती वाढूनही, संवेदनशील ग्राहकांना दिलासा देण्यासाठी सरकारने किरकोळ बाजारातील इंधन दर गेल्या दोन वर्षांपासून स्थिर ठेवल्याचा दावा केला होता. मात्र, काही राज्यांमधील विधानसभा निवडणुकांमुळेच सरकारने ही दरवाढ रोखून धरली होती, असा आरोप विरोधी पक्षांनी केला आहे.

------------

**क्रिमीलेअर मर्यादा ८ लाखांवरून**

जात आहे. राज्यातील३६ जिल्ह्यांमध्ये मुला-मुलींसाठी एकूण ७२ वसतिगृहे सुरू करण्यात आली असून यासाठी इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी सातत्याने पाठपुरावा केल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केले. वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी 'स्वयंम' योजना सुरू करण्यात आली असून या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना राहणीमान आणि शिक्षणासाठी ६० हजार रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य दिले जाते. महाज्योती संस्थेमार्फत यूपीएससी आणि एमपीएससीसह विविध स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून यूपीएससीमध्ये २९ तर एमपीएससीमध्ये ११८ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले असल्याची माहिती त्यांनी दिली. स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी ओबीसी महामंडळामार्फत युवकांना १५ लाख रुपयांपर्यंत कर्ज उपलब्ध करून दिले जात असून या कर्जाला शासन हमी देते. तसेच प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ न मिळालेल्या घटकांसाठी 'मोदी आवास योजना' सुरू करण्यात आली असून घरकुलासाठी आर्थिक सहाय्य दिले जात आहे. याशिवाय सौरऊर्जेसाठी स्वतंत्र अनुदान दिले जात असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितले. ओबीसी कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची गुणवत्ता आणि परिणामकारकता अधिक वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात असून समितीकडून प्राप्त होणाऱ्या सूचनांचा विचार करून आवश्यक सुधारणा करण्यात येतील असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केले.

--------------

**निट पेपरफुटी प्रकरण : शिवराज**

माहिती समोर आली आहे. मंगळवारी दुसऱ्या दिवशीही सीबीआयचे पथक लातूरमधील आरसीसी क्लासमध्ये तळ ठोकून आहे. क्लासमधील संगणकीय डेटा, हार्ड डिस्क आणि डिजिटल पुराव्यांची तपासणी सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. तपास यंत्रणेला संशय आहे की, आरसीसी क्लासने घेतलेल्या कथित ''मॉक प्रश्नपत्रिका'' आणि प्रत्यक्ष नीट परीक्षेची प्रश्नपत्रिका यात कमालीचे साम्य आहे. सीबीआय सध्या याची कसून पडताळणी करत आहे. परीक्षापूर्व सत्रात विद्यार्थ्यांना सोडवायला दिलेल्या प्रश्नांचे मूळ काय होते? क्लासमधील कोणते विशिष्ट विद्यार्थी थेट व्यवस्थापनाच्या संपर्कात होते? ऐन परीक्षेच्या आधी घेतलेल्या विशेष सत्रांमधील संशयास्पद हालचाली याबाबत तपास केला जात आहे. या प्रकरणात आरसीसीचे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर यांची यापूर्वीही अनेक तास चौकशी करण्यात आली आहे. तपासादरम्यान सीबीआयच्या हाती काही महत्त्वाचे धागेदोरे लागले असून, पेपरफुटीची ही कथित प्रश्नपत्रिका सर्वप्रथम 'विवेक पाटील' याच्यासह काही विशिष्ट व्यक्तींपर्यंत पोहोचली होती, असा संशय यंत्रणेला आहे. सीबीआय आता या संभाव्य दुव्यांचा शोध घेत आहे.

**नीट पेपर फुटीचे धागेदोरे आता बिलोलीपर्यंत**

देशभरात प्रचंड खळबळ उडवून देणाऱ्या 'नीट' परीक्षा पेपर फुटी प्रकरणाचे धागेदोरे आता नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्यापर्यंत पोहोचल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. लातूर आणि नांदेडमधील या प्रकरणाचा मुख्य सूत्रधार प्रा. शिवराज मोटेगावकर याला केंद्रीय अन्वेषण विभागाने अटक केल्यानंतर, आता त्याचा नांदेडमधील 'मुख्य सल्लागार' सीबीआयच्या रडारवर असल्याची चर्चा आहे. हा सल्लागार मूळचा बिलोली येथील रहिवासी असल्याची जोरदार चर्चा सोशल मीडियावर आणि राजकीय वर्तुळात सुरू झाल्याने संपूर्ण नांदेड जिल्ह्यात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे.

---------

**राज्यात महिनाभर पुरेल इतकाच**

नागरिकांमध्ये वाद आणि हाणामारीच्या घटनाही घडत असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, पेट्रोलियम मंत्रालयाच्या सहसचिव सुजाता शर्मा यांनी देशात तेल किंवा गॅसची कमतरता नसल्याचे स्पष्ट केले आहे. मात्र काही भागांत पुरवठा व्यवस्थेमध्ये अडथळे येत असल्याने तात्पुरता तुटवडा जाणवत असल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, पेट्रोल आणि डिझेलच्या दरात पुन्हा वाढ झाली असून इंधनाच्या किंमतीत सुमारे ९० पैशांची वाढ झाल्याने महागाईचा भार सर्वसामान्यांवर पडत आहे. वाढते इंधनदर आणि संभाव्य तुटवड्यामुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

-----------

**भटक्या कुत्र्यांबाबत सर्वोच्च**

नोव्हेंबर २०२५ मध्ये दिलेल्या रूग्णालय, शाळा, कॉलेज, बस स्टेशन, रेल्वे स्टेशन इत्यादी सार्वजनिक ठिकाणांवरून भटकी कुत्री हटवण्याच्या आपल्या आदेशात दुरूस्ती करण्यास नकार दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या आदेशात राज्य आणि केंद्र शासित प्रदेशांना ॲनिमल वेलफेअर बोर्ड ऑफ इंडियाचे फ्रेमवर्क अजून बळकट करण्याचे निर्गेश दिले आहेत. तसेच राज्यांना प्रत्येक जिल्ह्यात एक तरी पूर्ण क्षमतेचे ॲनिमल बर्थ कन्ट्रोल सेंटर स्थापन करण्याचे देखील निर्देश दिले आहेत. न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती संदीप मेहता आणि न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारिया यांच्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाकडून हा निकाल दिला. या प्रकरणी राज्य सरकारे, महानगरपालिका, प्राणी हक्क संघटना, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडिया यांच्यासह सर्व घटकांची सविस्तर बाजू ऐकून घेतल्यानंतर खंडपीठाने २९ जानेवारी रोजी आपला निकाल राखून ठेवला होता. देशभरात, विशेषतः लहान मुलांमध्ये, कुत्रे चावण्याच्या आणि रेबीजच्या वाढत्या घटनांमुळे गेल्या वर्षी न्यायालयाने स्वतःहून या प्रकरणाची दखल घेतली होती. यानंतर, सर्वोच्च न्यायालयाच्या दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाने दिल्ली-एनसीआरमधील प्रशासनाला भटक्या कुत्र्यांना पकडून शेल्टर होममध्ये (निवार्यांमध्ये) हलवण्याचे निर्देश दिले होते. ऑगस्ट २०२५ मधील त्या आदेशात न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांना भटक्या कुत्र्यांना सार्वजनिक ठिकाणांवरून हटवण्याचे आणि नसबंदी व लसीकरणानंतरही त्यांना पुन्हा रस्त्यावर न सोडण्याचे निर्देश दिले होते. तसेच या कामात कोणीही किंवा कोणत्याही संघटनेने अडथळा आणल्यास न्यायालयाचा अवमान मानला जाईल, असा इशाराही दिला होता.

------------

**'या' लाडक्या बहिणींवर कारवाई**

वंचित राहावे लागू नये, यासाठी सरकारकडून प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. ई-केवायसीनंतर काही महिलांचे लाभ बंद करण्यात आले होते. मात्र त्यानंतर अनेक तक्रारी सरकारकडे प्राप्त झाल्या आहेत. काही महिलांच्या नावावर प्रत्यक्षात वाहन नसतानाही आरटीओच्या डेटामध्ये त्यांचे नाव दिसत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. याबाबत बोलताना आदिती तटकरे म्हणाल्या की, संबंधित महिलांनी आवश्यक कागदपत्रे आणि पुरावे सादर केल्यानंतर पडताळणी केली जाईल. चौकशीत त्या पात्र आढळल्यास त्यांचा लाभ पुन्हा सुरू करण्यात येईल.

-----------

**राज्यातील पाणीस्त्रोत कोरडे पडू लागले**

विभागात वापरण्यात येत आहेत. अमरावती विभागात १७ गावांसाठी १७ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. नागपूर विभागात सध्या कोणत्याही ठिकाणी टँकरची आवश्यकता भासलेली नाही. राज्यातील पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर संबंधित जिल्हा प्रशासन, ग्रामपंचायती आणि पाणीपुरवठा विभाग यांच्याकडून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत आहे. नागरिकांना नियमित आणि सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येत असून टँकर पुरवठ्याबरोबरच पर्यायी जलस्रोतांचा वापर, विहिरींचे अधिग्रहण आणि जलसाठ्यांचे नियोजन यावरही भर दिला जात आहे. आगामी काळात तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने पाणीटंचाईग्रस्त भागांमध्ये आवश्यकतेनुसार अतिरिक्त टँकर उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

## थोडक्यात



### मोठेवाडीत मोफत आरोग्य तपासणी शिबिर

माजलगाव । प्रतिनिधी


तालुक्यातील मोठेवाडी येथील विठाई हास्पिटल आणि हरिप्रल्हाद मेडीकल यांच्या वर्धापन दिनानिमित्त विशेष उपक्रम म्हणून मोफत बीपी,शुगर तपासणी शिबिर दि १९ मे मंगळवार रोजी घेण्यात आले. या शिबिरात माजलगाव येथील तज्ञ डॉ. श्रेयश देशपांडे यांनी शेकडो रूगणांची मोफत आरोग्य तपासणी केली.

ग्रामीण भागातील जनतेला वैद्यकीय सुविधा उपलब्ध होत नाहीत. या हेतुने विठाई हास्पिटलचे संचालक डॉ. रामेश्वर जंगले व डॉ. प्रतिक्षा जंगले यांनी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. आरोग्य शिबिर ग्रामीण भागात यशस्वीपणे घेऊन गरजूंना त्याचा लाभ मिळवून दिला. दरम्यान, मंगळवारी झालेल्या मोफत आरोग्य शिबिराने अनेकांना दिलासा मिळाला. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी गोपाळ खेत्री, भिमराव जंगले,संतोष खेत्री, दामोधर खेत्री, नागेश खटले यांनी विशेष परिश्रम घेतले.

### रुद्रप्रतापसिंह तौर याचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील राजेगाव येथील सरस्वती विद्यालयाचा विद्यार्थी रुद्रप्रतापसिंह योगेश तौर याने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यावतीने घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता पाचवी मध्ये घवघवीत यश मिळवले आहे.तो पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरला आहे.



ग्रामीण भागात शिक्षण घेऊन रुद्रप्रतापसिंह याने विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवले आहे. तो नवोदय विद्यालय , सैनिकी स्कूल प्रवेशासाठी देखील पात्र ठरला आहे. या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार राधाकृष्ण पाटील, सतीश दुगड, सचिव माजी नगराध्यक्ष अशोक होके पाटील, दयानंद तोष्णीवाल, विलासराव लांडगे , संतोष कोथाळकर, प्रभाकराव कचरे, डॉ. योगिता होके पाटील, अभय होके पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष बाळासाहेब कचरे, उपाध्यक्ष विजय साळवे, शिक्षणप्रेमी नागरिक डॉ. जनक चौरे, मुख्याध्यापक अशोक कचरे यांच्यासह सर्व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

### समाधान महाराज शर्मा यांच्या शिवमहापुराण कथेला प्रारंभ

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रीय कीर्तनकार तथा सुप्रसिद्ध शिवपुराण कथाकार भावरत्न ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांच्या सुश्राव्य वाणीतून श्री शिवमहापुराण कथेला सोमवार दि.१८ मे २०२६ पासून बीड येथे प्रारंभ झाला आहे. बीड शहरातील सावता माळी चौक, श्रीकृष्ण मंदिराजवळ आयोजित कथेसाठी भव्य मंडप व व्यासपीठ उभारण्यात आले आहे. कथा वेळ दररोज सायंकाळी ७.०० ते १०.०० वाजेपर्यंत आहे. भाविकांनी या कथेचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# शासन योजनांचा रास्त लाभ देण्यासाठी फार्मर आयडीमधील दोष दूर करावेत - आ.पंडित

## आ. विजयसिंह पंडित यांची कृषी दत्तात्रय भरणे यांच्यासोबत बैठक

मुंबई । प्रतिनिधी

फार्मर आयडीमधील तांत्रिक दोष दूर करून शेतकऱ्यांना शासन योजनांचा लाभ मिळवून देण्यासंदर्भात अर्थसंकल्पीय अधिवेशनात लक्षवेधी सूचनेवरील चर्चे दरम्यान दिलेल्या आश्वासनाप्रमाणे राज्याचे कृषिमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांनी आज मंत्रालयात याबाबत बैठकीचे आयोजन केले. या बैठकीत फार्मर आयडीमधील तांत्रिक दोष दुरुस्त करण्यासंदर्भात आढावा घेऊन चर्चा करण्यात आली. विधानसभेतील चर्चेनंतर या कामी युद्धपातळीवर काम करण्यात आले त्यानंतरही शिल्लक राहिलेल्या फार्मर आयडी मधील दुरुस्त्या पुढील पंधरा दिवसात कराव्यात. महसूल आणि कृषी या दोन्ही विभागाच्या अधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करू पोखरा योजनेचा लाभ शेतकऱ्यांना मिळवून द्यावा असे



निर्देश कृषिमंत्री महोदयांनी दिले असल्याची माहिती आ. विजयसिंह पंडित यांनी दिली.

याबाबत माहिती देताना ते पुढे म्हणाले की, फार्मर आयडी हा शेतकऱ्यांचा एकमेव ओळख क्रमांक असल्यामुळे, शासनाच्या विविध योजनांचा व सेवांचा लाभ घेण्यासाठी तो अतिशय महत्त्वाचा आहे. त्यामुळे फार्मर आयडीमधील तांत्रिक दोष दूर करणे सुलभ व्हावे, या दृष्टिकोनातून तात्काळ उपाययोजना कराव्यात, अशा सूचना मंत्री महोदयांनी यावेळी दिल्या.

विधानसभेतील चर्चेनंतर फार्मर आयडी दुरुस्त करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. पायलट प्रोजेक्ट म्हणून सन २०२३ मध्ये अॅग्री स्टॅक प्रकल्पांतर्गत देण्यात आलेल्या सदोष फार्मर आयडीच्या दुरुस्तीची कार्यवाही जवळपास पूर्ण झालेली आहे.पोखरा योजनेचा लाभ घेताना शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणींबाबत सातत्याने तक्रारी प्राप्त होत आहेत. कृषी विभाग आणि महसूल विभाग यांच्या समन्वयाने फार्मर आयडीच्या अनुषंगाने डेटा अपडेट करून तो जुळवून घेण्यावर या बैठकीत भर देण्यात आला. पंधरा दिवसांनंतर माननीय कृषिमंत्री या संदर्भात पुन्हा एकदा आढावा घेणार आहेत. या सर्व प्रक्रियेचा बीड जिल्ह्यातील सुमारे २ लाख ४१ हजार शेतकऱ्यांना थेट लाभ होणार आहे. फार्मर आयडीमधील नावात बदल, क्षेत्रातील बदल, मोबाईल क्रमांकातील बदल किंवा आधार कार्ड आदींसंदर्भात शेतकऱ्यांच्या काही तक्रारी असल्यास, त्यांनी तात्काळ तहसील कार्यालयात लेखी अर्ज करावेत, असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे. या बैठकीला कृषिमंत्री ना. दत्तामामा भरणे, आ. विजयसिंह पंडित यांच्यासह राज्याचे जमाबंदी आयुक्त आणि अॅग्री स्टॅकचे संचालक यांच्यासह संबंधित अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

# आंदोलनाचा इशारा देताच कारखानदार सजग

## महिण्याखेर प्रलंबित देयक अदा करण्याचे अभिवचन

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील अनेक ऊस कारखान्यांनी गाळप केलेल्या उसाचे शेतकऱ्यांना पैसे दिलेले नाहीत. वास्तविक पाहता पंधरा दिवसाच्या आत शेतकऱ्यांना ही ऊसाची रक्कम मिळणे अनिवार्य असताना ऊस कारखाना व्यवस्थापनाने अजून ही रक्कम शेतकऱ्यांना दिलेली नाही यामुळे ऊस उत्पादक शेतकरी संतप्त असून सनदशीर मार्गाने हा प्रश्न सोडविण्यात यावा अशी मागणी ऊस उत्पादक शेतकरी करत असून सायखेडा येथील २१ शुगर्स कारखान्याकडून प्रलंबित असलेल्या ऊस देयकप्रश्नी सत्याग्रह आंदोलन करण्याचा इशारा देताच कारखाना प्रशासनाने या महिण्याखेर प्रलंबित सर्व ऊस देयक घोषित केलेल्या दराप्रमाणे अदा करण्याचे



लेखी आश्वासन दिले.

बीड जिल्ह्यातील तसेच जिल्हयाच्या सीमेवर असलेल्या परभणी जिल्ह्यातील सायखेडा येथील २१ शुगर्स साखर कारखान्याने जिल्हयातील सीमावर्ती भागातील असंख्य शेतकऱ्यांच्या ऊस गाळपाला नेला. कायद्यानुसार ऊस गाळप पश्चात्य १५ दिवसात कारखाना प्रशासनाने ऊस देयक अदा करणे बंधनकारक असताना देखील असंख्य शेतकऱ्यांची मागील चार महिन्यापासून कोट्यावधीची रक्कम साखर कारखानदाराने अद्याप ही शेतकऱ्यांना अदा केलेली नाही. प्रलंबित ऊस देयक अदा करण्यात यावेत याकरिता अखिल भारतीय किसान सभा, ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समिती मार्फत वेळोवेळी निवेदने, आंदोलने करण्यात आली मात्र साखर कारखानदाराकडून देण्यात आलेल्या आश्वासनाची पूर्तता न झाल्याने शेतकरी आक्रमक होत सोमवार दि १८ पासून साखर कारखान्यावर सत्याग्रह आंदोलन करण्याचा इशारा देताच कारखाना प्रशासनाने आंदोलनकर्त्यांना ३१ मे अखेर प्रलंबित सर्व शेतकऱ्यांची ऊस देयक अदा करण्यात येतील असे लेखी अभिवचन दिल्याने हे आंदोलन स्थगित करण्यात आले. या प्रसंगी ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समितीचे ॲड.अजय बुरांडे यांच्यासह मुरलीधर नागरगोजे, ऋषिकेश जोगदंड, कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती जाधव विश्वाबर जोगदंड, शिवाजी कदम, श्रीराम बडे, सरपंच रघुनाथ देशमुख, ॲड.श्रीनिवास मुंडे यांच्यासह असंख्य शेतकरी उपस्थित होते.

# डास उत्पत्तीस्थाने नष्ट करावेत –वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवानी बोडखे

## कडा प्रा.आ.केंद्रात राष्ट्रीय डेंग्यू दिन संपन्न; डेंग्यूची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय आणि गप्पी माशांच्या वापराविषयी कर्मचाऱ्यांना केले मार्गदर्शन

आष्टी । प्रतिनिधी

पावसाळ्याच्या तोंडावर डेंग्यूसारख्या कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आरोग्य विभाग आतापासूनच सतर्क झाला आहे. याच पार्श्वभूमीवर, आष्टी तालुक्यातील कडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात काल दि. १६ मे रोजी राष्ट्रीय डेंग्यू दिवस मोठ्या उत्साहात आणि जनजागृतीपर कार्यक्रमाने साजरा करण्यात आला. यावेळी परिसरातील नागरिकांचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी डेंग्यू प्रतिबंध आणि उपाययोजनांबाबत उपस्थित आरोग्य कर्मचाऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.कडाप्राथमिक आरोग्य केंद्र येथे १६ मे रोजी राष्ट्रीय

डेंग्यू दिन मोठ्या उत्साहात आणि जनजागृतीपर वातावरणात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. विजयसिंह शिंदे व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र तांदळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. पावसाळा तोंडावर असल्याने डासांची उत्पत्ती कशी रोखावी आणि डेंग्यूपासून स्वतःचा बचाव करावायाचे मार्गदर्शन यावेळी डॉ.शिवानी बोडखे – विधाते यांनी केले. डेंग्यू टाळण्यासाठी जनजागृतीच मुख्य शस्त्र या विशेष कार्यक्रमात बोलताना वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवानी बोडखे– विधाते आणि वैद्यकीय अधिकारी डॉ.अमान बेग यांनी डेंग्यू आजाराविषयी सखोल माहिती दिली.डेंग्यू या आजाराची प्राथमिक लक्षणे कोणती,त्याचा




प्रसार एडिस इजिप्ती डासांमार्फत कसा होतो आणि तो टाळण्यासाठी कोणती काळजी घ्यावी, यावर त्यांनी प्रकाश टाकला.

''डेंग्यूचा डास हा साचलेल्या स्वच्छ पाण्यात अंडी घालतो. त्यामुळे घरातील आणि परिसरातील पाणी साठवणारी भांडी, उघडे टायर, नारळाच्या करवंट्या यामध्ये पाणी साचू न देणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे.नागरिकांनी आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळावा असे आवाहन डॉ. शिवानी बोडखे–विधाते यांनी केले. डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी साठवलेल्या मोठ्या पाण्याच्या टाक्या, विहिरी आणि डबक्यांमध्ये गप्पी माशांचा वापर करणे हा अत्यंत प्रभावी आणि नैसर्गिक उपाय आहे अशी माहिती डॉ.अमान बेग यांनी दिली.गप्पी मासे डासांच्या अळ्या खाऊन फस्त करतात,त्यामुळे डासांची पैदास नैसर्गिकरित्या थांबते असे त्यांनी स्पष्ट केले.याप्रसंगी प्रख्यात कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया तज्ज्ञ (सर्जन) डॉ.सुजित मसूरे यांनीही आपले विचार मांडले. आरोग्य कर्मचाऱ्यांनी ही माहिती केवळ स्वतःपुरती मर्यादित न ठेवता, ती तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवावी. लोकांमध्ये डेंग्यूविषयी असलेली भीती दूर करून त्यांना योग्य ती काळजी घेण्यास प्रवृत्त करावे असे मार्गदर्शन डॉ. सुजित मसूरे यांनी केले.कडा प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व वैद्यकीय अधिकारी,आरोग्य कर्मचारी, परिचारिका आणि आशा सेविका या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.या मार्गदर्शनामुळे आरोग्य कर्मचाऱ्यांच्या ज्ञानात भर पडली आहे.आगामी काळात डेंग्यूमुक्त परिसरासाठी जोमाने काम करण्याचा संकल्प सर्व उपस्थित कर्मचाऱ्यांनी यावेळी केला. यावेळी प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी,आरोग्य निरीक्षक,आरोग्य सेवक आणि आरोग्य सेविका, बबन झगडे, आकाश फरांडे, एम.बी.दुनघव, आर.एम.काळे,बी. के.झगडे,श्रीमती एल.यु.आत्राम, श्रीमती एस.बी. गायकवाड, श्रीमती जे.सी. शेळके,श्रीमती एन. व्ही.मोरे,पी.टी. देसाई,श्रीमती ए.बी.धस,ए.एन. परकाळे,श्रीमती व्ही.एम.गुरसाळी, श्रीमती जे.आर. दातीर,विनायक धोंडे, सय्यद नदीम, आयुब हे उपस्थित होते.

# प्रा.बबन आंधळे यांना पद्मपाणि राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

बीड । प्रतिनिधी

दिनांक २० ५ २०२६ ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक तथा संत तुकाराम प्राथमिक विद्यालयाचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक व सामाजिक कार्यकर्ते प्राध्यापक बबनराव आंधळे यांना पद्मपाणी राज्यस्तरीय उत्कृष्ट सामाजिक कार्य गौरव पुरस्कार २०२६ जाहीर झाला आहे हा पुरस्कार रविवार दिनांक १७ मे रोजी दुपारी दोन वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

पद्मपाणि प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित या सोहळ्यात पोलीस निरीक्षक जाधवर साहेब, पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव मॅडम यांच्या हस्ते प्राध्यापक बबनराव आंधळे व सुविद्य पत्नी सौ. कावेरताई बबनरावआंधळे यांनी पुरस्कार स्वीकारला प्राध्यापक आंधळे यांनी समाजासाठी केलेल्या




निस्वार्थ व उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा राज्यस्तरीय सन्मान जाहीर करण्यात आला आहे. सामाजिक प्रश्नावर सातत्याने भूमिका मांडणे, जनसामान्यांचा अडचणी सोडविण्यासाठी संघर्ष करणे, तसेच विविध आंदोलनाच्या माध्यमातून प्रशासनापर्यंत पोहोचवून ते मार्गी लावण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. ओबीसी समाजाच्या हक्कांसाठी लढा, विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न तसेच शेतकरी संघर्ष समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी मोर्चे व आंदोलने आयोजित करून त्यांनी समाजात वेगळी ओळख निर्माण केली आहे शिक्षकांच्या प्रश्नांसाठी झालेल्या भिक मांगो आंदोलनात ही त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला होता गेल्या २५ वर्षांपासून ते बानेगाव ग्रामपंचायतचे ग्रामपंचायत सदस्य म्हणून कार्यरत असून गावात ग्रामपंचायत हद्दीत मुलगी जन्माला आल्यानंतर तिच्या नावाने १०,०००/-अक्षरी:- दहा हजार रुपयाची एफ डी( ) करण्याचा अभिनव उपक्रमही ते त्यांच्या गावामध्ये सातत्याने राबवत आहेत त्यांच्या या सामाजिक बांधिलकीमुळे समाजात सकारात्मक परिवर्तन घडत असून अनेक तरुणांसाठी ते प्रेरणास्थान ठरत आहेत संत भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठान बार्शी रोड बीड येथे डॉक्टर संजय तांदळे यांच्या मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने राज्यस्तरीय पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आलेले आहे. पद्मपाणि प्रतिष्ठानच्या वतीने हा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान झाल्यानंतर प्रतिक्रिया देताना प्राध्यापक बबनराव आंधळे म्हणाले समाजासाठी केलेल्या कामाची खरी पावती आज मला मिळाली आहे. समाजाकडून मिळणारा सन्मान हा खूप मोठा असतो हा पुरस्कार माझ्यासाठी अभिमानाचा क्षण असून समाजातील प्रत्येक व्यक्तीसाठी प्रेरणादायी ठरेल यासाठी पद्मपाणि प्रतिष्ठानच्या आयोजक व संपूर्ण टीमचे मी मनःपूर्वक आभार मानतो दरम्यान हा पुरस्कार प्रदान झाल्यानंतर विविध स्तरांतून प्राध्यापक बबनराव आंधळे यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे

जा.क्र./न.प.अंबड नामांतर/२०२६/२७०
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक २३/०४/२०२६

### नांव बदलण्याचा जाहिरनामा

अर्जदार श्री. सौ. श्रीमती :- १) शालन गुलाब बुर्ले २) हरेश गुलाब बुर्ले ३) अक्षय गुलाब बुर्ले

प्रकरण : सिटि सर्वे नं ५३३ मधील नं प घर नं ३-२१ चे हस्तातरण करणे बाबत

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील भावदो गल्लो येथे न.प. मालमत्ता घर क्र. (३-२१) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला इमारतीचे/जायेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतुः सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा, नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व :- जितेंद्र माणिक बुर्ले यांचे घर
पश्चिम वराडे यांचे घर
दक्षिण :- सुरेंद्र प्रभाकर बुर्ले यांचे घर
उत्तर :- दीपक शेलार यांचे घर

स्वाक्षरित/-
मुख्याधिकारी
नगर परिषद, अंबड

## पान ६ वरुन...

### अंबाजोगाईचे भूलतज्ज्ञ

प्राथमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत झाले होते. या बिकट परिस्थितीवर मात करत त्यांनी शालांत व उच्च माध्यमिक परीक्षेत उत्कृष्ट गुण मिळवले. त्यानंतर अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयातूनच त्यांनी वैद्यकीय पदवी (चइइड) घेतली. पुढे याच महाविद्यालयातून त्यांनी 'भूलशास्त्र' विषयात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. याच संस्थेत 'ज्युनिअर रेसिडेंट' म्हणून रुजू झालेले डॉ. तरकसे आपल्या कौशल्याच्या जोरावर पुढे याच विभागाचे प्रमुख म्हणून कार्यरत होते. वैद्यकीय महाविद्यालयात भूलतज्ञ विभाग प्रमुख म्हणून धुरा सांभाळणारे स्वच्छ आणि मनमिळावू गोरगरी रुग्णासाठी धावणारे सुप्रसिद्ध भूलतज्ञ डॉ अभिमन्यू तरकसे यांच्या निधनाची वार्ता अत्यंत धक्कादायक ठरली असून स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाची मोठी हानी झाली आहे आंबेजोगाईसाठी जिवापाड मेहनत घेणारे एक प्रचंड बुद्धिमान डॉक्टरचे निधन ही बातमी आमच्यासाठी धक्कादायक ठरली आहे अशी प्रतिक्रिया स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ शंकर धपाटे यांनी दिली.

### नीट पेपरफुटी प्रकरणी

लोकांना यावरोधात रस्त्यावर उतरण्याचे आवाहन केले. यावेळी विद्यार्थ्यांमध्ये आक्रोश दिसत होता. यावेळी एसएफआयच्या वतीने मुख्यमंत्र्यांना तहसीलदार यांच्या मार्फत निवेदन पाठवण्यात आले या निवेदनामध्ये १) घोटाळ्याची सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या मार्फत चौकशी करण्यात यावी. २) पेपर फुटीच्या सूत्रधारांना कडक शिक्षा करण्यात यावी. ३) ज्या परीक्षा केंद्रावरील गैरप्रकार झाले त्या केंद्राची मान्यता त्वरित रद्द करावी ४) केंद्रीय शिक्षण मंत्र्यांचा तात्काळ राजीनामा घेण्यात यावा या व अन्य मागण्या एसएफआय वडवणी तालुका कमिटीच्या वतीने करण्यात आल्या. या आंदोलनात एसएफआयचे राज्य सहसचिव लहू खारगे, जिल्हाध्यक्ष सत्यजित मस्के, बीडचे माजी सहसचिव अभिषेक शिंदे यांनी आंदोलनाला संबोधित करत केंद्र सरकार वर ताशेरे ओढले. यावेळी ज्योतीराम कलेढोण, नैतिक साबळे, पठाण सलमान, प्रतिक साळवे, शेख रिजवान, अमन कुरेशी, पी. शंतनु, कृष्णा हेंद्रे, पृथ्वीराज मुंडे, कार्तिक तोंडे, अजय आडे, सोहम फुटाणे, प्रथमेश, बोंदार्डे यांच्यासह विद्यार्थी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### स्थानिक स्वराज्य संस्था

ओळखले जातात. त्यांच्या कार्यालयात दररोज गोरगरीब, शेतकरी आणि तरुणांच्या कामासाठी लागणारी रिघ हेच त्यांच्या लोकप्रियतेचे सर्वात मोठे गमक आहे. सर्वसामान्य जनतेशी त्यांची नाळ घट्ट जुळलेली आहे. अक्षय मुंदडा हे मुंडे घराण्याशी अत्यंत एकनिष्ठ मानले जातात. महायुतीमधील भाजपसह सर्वच घटक पक्षांतील प्रमुख नेत्यांशी आणि कार्यकर्त्यांशी त्यांचे अतिशय मधुर व जिव्हाळ्याचे संबंध आहेत. त्यांच्या या सर्वसमावेशक स्वभावामुळे त्यांना या निवडणुकीत उमेदवारी मिळाल्यास बीड, लातूर आणि धाराशिव या तिन्ही जिल्ह्यांत महायुतीला मोठा फायदा होऊ शकतो, असा राजकीय विश्लेषकांचा अंदाज आहे.

### १ लाख ७७ हजार शेतकरी

संकटात सापडत असल्याने शेतकरी दुहेरी संकटाचा सामना करत आहेत. अशा परिस्थितीत शासनाने जाहीर केलेली मदत तातडीने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावी. अन्यथा आगामी आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल,असा इशाराही त्यांनी दिला. या आंदोलनादरम्यान जिल्ह्यातील विमा लाभधारक शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी होऊन त्यांच्या प्रलंबित विमा व नुकसानभरपाईच्या मागण्या लोकप्रतिनिधीं समोर मांडणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

### वीज वितरण अधिकाऱ्यांची

निकड निर्माण झाल्याने हा बोगस प्रकार उघड होऊ लागला असून यामध्ये कर्मचारी बेजार झाले आहेत. बीड शहरांमध्ये प्रत्येक दहा मिनिटाला वीजपुरवठा खंडित होत आहे. या मागचे कारण क्षमते पेक्षा कमी के. व्ही. ए. चे ट्रांसफार्मर वापरले जात आहेत. याशिवाय जे ट्रांसफार्मर वापरले जातात त्यांचाही दर्जा निकृष्ट आहे. वीज वितरण कंपनी जे साहित्य वापरते त्यातही फारसा दम नसतो. अनेक वेळा फ्युज जळून जातात. केबलचे कनेक्शन जळून केबल तुटते. विजेच्या तारा जास्त गरम झाल्याने लोंबकळू लागतात. हे प्रकार आता सर्रास सुरू झाले असून वीज वितरण कंपनीचा बोगस कारभार आता चव्हाट्यावर आला आहे.असाच प्रकार चालू राहिला तर एक दिवस लोक कार्यालयात येऊन अधिकाऱ्यांचे थोबाड रंगवतील. वेळीच जर कारभार सुधारला नाही तर वीज वितरण कंपनीची खैर नाही. या प्रकाराला अधिकारी आणि ठेकेदार जबाबदार असून सर्वसामान्य कर्मचारी मात्र पाच- पाच मिनिटाला डीपी जवळ जाऊन उभे राहतात. कधी लाईट जाईल याची त्यांनाही खात्री नसते. आणि ग्राहक मात्र कर्मचाऱ्यांना शिव्या घालतात. अधिकारी मात्र मजेत एसीमध्ये झोपा काढतात आणि वीज वितरण कंपनीचे ठेकेदार पैसे वसूल करून गब्बर झाले या दोघांनाही सर्व सामान्य ग्राहकांचे काही देणे घेणे नसते वेळीच कारभार सुधारा नसता लोक कार्यालयात येऊन तुमची हजामत करतील हे अधिकाऱ्यांनीही आता लक्षात ठेवावे.

राज्य लोकतंत्र
# शेत-शिवार
बुधवार दि.२० मे २०२६
४

# 'एल निनो'च्या पार्श्वभूमीवर विद्यापीठांनी दिशादर्शक भूमिका घ्यावी - कृषिमंत्री भरणे




परभणी : हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शेतीसमोरील आव्हाने वाढत असताना कृषी विद्यापीठांची भूमिका अधिक महत्त्वाची ठरत आहे. 'एल निनो'च्या संकटामुळे मराठवाड्यातील कोरडवाहू शेतीसमोर गंभीर आव्हाने उभी राहिली असून, अशा परिस्थितीत कृषी विद्यापीठांनी दिशादर्शक कामकाज करणे आवश्यक आहे. प्रयोगशाळेतील तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचले पाहिजे, असे प्रतिपादन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या ५४ व्या वर्धापनदिनानिमित्त विस्तार शिक्षण संचालनालय आणि कृषी विभागातर्फे आयोजित खरीप पीक परिसंवादाच्या उद्घाटन कार्यक्रमात ते दूरदृश्यप्रणालीद्वारे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. इंद्रमणी मिश्रा होते. यावेळी भारतीय कृषी संशोधन परिषदेचे माजी महासंचालक डॉ. पंजाबसिंग, महापौर सय्यद इक्बाल, माजी खासदार सुरेश जाधव, विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे, संशोधन संचालक डॉ. खिजर बेग, प्रभारी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दौलत चव्हाण, प्रभारी कुलसचिव पी. के. काळे, प्रभारी नियंत्रक अनंत कदम, विस्तार शिक्षण अधिकारी डॉ. प्रशांत देशमुख आदी उपस्थित होते. कृषिमंत्री भरणे म्हणाले, की राज्यातील चार कृषी विद्यापीठांच्या स्थापनेतून हरितक्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांची दूरदृष्टी दिसून येते. परभणी कृषी विद्यापीठाचा 'माझा एक दिवस माझ्या बळिराजासाठी' हा अभिनव उपक्रम कौतुकास्पद आहे. ड्रोन तंत्रज्ञान, कीड व रोगांचा प्रादुर्भाव ओळखण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर तसेच महाविस्तार यांसारख्या तंत्रज्ञानातील विद्यापीठाची कामगिरी महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी नमूद केले. ते पुढे म्हणाले, की शेतकऱ्यांनी पाणी व्यवस्थापन, पीक वैविध्यीकरण आणि डिजिटल साधनांचा स्वीकार करणे गरजेचे आहे. नैसर्गिक संकटांसोबतच शेतीमालाला अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्यामुळे शेतकरी अडचणीत आहेत. विविध योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. डॉ. पंजाबसिंग म्हणाले, की कमी उत्पन्नामुळे अनेक शेतकरी अद्याप आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहेत. कृषी विद्यापीठांनी विकसित केलेले तंत्रज्ञान त्यांच्या बांधापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. कुलगुरू डॉ. इंद्रमणी मिश्रा म्हणाले, की परभणी येथे १९१८ पासून देशी कापूस संशोधन केंद्र कार्यरत आहे. तसेच ५४ वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या कृषी विद्यापीठाच्या जडणघडणीत अनेक कुलगुरू आणि शास्त्रज्ञांचे योगदान महत्त्वाचे राहिले आहे. मागील चार वर्षांत प्रयोगशाळांचे बळकटीकरण करण्यात आले असून चार नवीन महाविद्यालये सुरू करण्यात आली आहेत. कमी मनुष्यबळावर कामकाज करत विद्यापीठाने 'अ' श्रेणी मानांकन प्राप्त केले असल्याचे त्यांनी सांगितले. तांत्रिक सत्रात विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी एल निनोच्या पार्श्वभूमीवरील पीक व्यवस्थापन तसेच विविध खरीप पिकांच्या लागवड व व्यवस्थापनाविषयी मार्गदर्शन केले.

**जूनपूर्वी कर्जमाफी योजना लागू**

भरणे म्हणाले, की 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' जूनपूर्वी लागू करण्यात येईल. या योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंत थकबाकी असलेल्या, तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ दिला जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## शेळ्यांमधील खुरसडा आजार; कारणे आणि उपाय



शेळीपालन हा एक फायदेशीर व्यवसाय आहे. शेळी पालन व्यवसाय करण्यासाठी कमीत कमी जागा व खर्चही कमीत कमी लागतो. कमी खर्चात जास्त उत्पन्न मिळवून देणारा हा खात्रीशीर व्यवसाय आहे. शेळीला गरीबाची गाय म्हटले जाते.शेळीपालनामध्ये शेळ्यांना लागणारे खाद्य त्यांचा निवारा व प्रजननाची व्यवस्थापन या गोष्टी वरपुरेसे लक्ष दिले तर शेळीपालनामध्ये तोटा जास्त करून येत नाही. या शिवाय शेळ्यांमध्ये होणारे सर्व सामान्य आजार याबाबतही जागरूक राहणे फार गरजेचे आहे.पावसाळ्यामध्ये शेळ्यांना सहजासहजी खुरसडाआजार होतो. याबाबत या लेखात महत्वाची माहिती घेऊ.

शेळ्यांमधील खुरसडा आजार : खुरसडा आजार हा जिवाणूमुळे होतो. यामध्ये शेळ्यांच्या पायातील दोन खूरांच्या मध्ये असलेल्या जागेवर जंतुसंसर्ग होतो. यामध्ये सुरुवातीला सूज येते व हळूहळू तो भाग सडायला सुरुवात होते व शेवटी पायाची खूर निकामी होते.

या आजाराचे लक्षणे : आजार झाल्यावर शेळ्या लंगडत चालतात आणि जाग्यावर उभे असतील तर ज्यापायाच्या खुराला सूज आहे तो पाय वर उचलून धरतात. तसेच या आजारात शेळ्यांचे वजन झपाट्याने कमी व्हायला लागते.

खुरसड आजारावर करायचे उपाय : ज्या शेळ्या पावसाळ्यात चरायला जातात त्यांच्या साठी फुट वॉश चा वापर करावा.फुट वॉश साठी पोटॅशियम परमॅग्नेट वझिंक सल्फेट च्या द्रावणाचावापर करावा. तसेच शेडच्या प्रवेशद्वाराजवळ दोन टक्के फॉर्मलीन द्रावण वापरावे.शेळ्यांमध्ये या आजाराची लक्षणे असो किंवा नसो तरी वरील उपाय योजना करणे आवश्यक आहे. ज्या शेळ्यानंमध्ये या आजाराची लक्षणे दिसतात अशा शेळ्यांना बाहेर चरायला सोडू नये.अशा प्रादुर्भावीतशेळ्यांना पाणी आणि खाद्य जागेवर द्यावे. कारण चरायला बाहेर गेल्यानंतर खुराला जखम होण्याची दाट शक्यता असते. आजार झाल्यास पशुवैद्यकाच्या सल्ल्याने उपचार करावेत असे बरे झालेल्या शेळ्यांना लगेच चरायला न सोडता तीन ते चार दिवस शेडमध्ये चारापाणी द्यावे. आजार झालेला असल्यास खुराकाचे प्रमाण जास्त वाढविल्यास शेळ्या लवकर बरे होतात.

या आजारावरील प्रतिबंधात्मक उपाय : १)शेळ्यांच्या खूर जास्तीचे वाढलेली असतील तर ते वेळोवेळी कापून काढावे. २)खुराच्या वरच्या बाजूचे केस जास्त वाढलेले असतील तर ते कापून काढावीत कारण यामध्ये घाणजमा होऊन नंतर खुरालासंसर्ग होतो.

३)खुराच्या मध्ये सूज आलेली आढळल्यास त्यावर माशा बसू नयेत किंवा आळ्या होऊ नयेत यासाठी स्प्रे मारावा. ४)उपचार करायच्या अगोदर पशुवैद्यकाचा सल्ला अवश्य घ्यावा.

## केंद्रीय कृषीमंत्र्यांच्या आश्वासनानंतरही कांदा उत्पादकांचा रोष कायम

### लासलगाव बाजार समितीत शेतकऱ्यांचा एल्गार

लासलगाव : राज्यात कांद्याला सध्या कवडीमोल भाव मिळत असल्याने सध्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. कांद्याला हमीभाव मिळावा, राज्य सरकारने तातडीने कांद्याला किमान २ ते ३ हजार हमीभाव द्यावा, तसेच प्रति क्विंटल १५०० रुपये अनुदान द्यावे. यासह शेतकऱ्यांच्या न्यायिक मागण्या व हक्कासाठी लासलगाव बाजार समितीत शेतकरी एल्गार आंदोलन पुकारण्यात आले. राज्यात पुन्हा एकदा कांद्याचा प्रश्न तापण्याची शक्यता आहे.



शासनाने दिलेले १२३५ रुपये भावाबद्दल शेतकरी समाधानी नाही. निर्यात खुली, मात्र कांदा बांगलादेशमध्ये जात नाही. श्रीलंकेत इम्पोर्ट टॅक्स लावल्याने श्रीलंकेत कांदा जात नाही. आखाती देशात युद्धाचा परिणाम असल्याने भाववाढ झालेली आहे, सहापट भाववाढ झाल्याने एक्सपोर्ट परवडत नाही. श्रीलंका इम्पोर्ट टॅक्स कमी झाला पाहिजे किंवा एक्सपोर्टला सबसिडी द्यावी. आखाती देशातील युद्ध, निर्यात बंदी आणि निसर्गाच्या प्रकोपामुळे कांद्याचा खर्चही निघत नाही. या सर्व मागण्यांवर कांदा उत्पादक शेतकरी यांच्या वतीने लासलगाव बाजार समितीमध्ये एल्गार आंदोलन करण्यात आले. राज्यात कांद्याचे दर कोसळल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. आखाती देशातील युद्ध, निर्यात बंदी आणि निसर्गाच्या प्रकोपामुळे कांद्याचा खर्चही निघत नसल्याने कांदा उत्पादक शेतकरी प्रचंड आर्थिक संकटात सापडला आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने तातडीने कांद्याला किमान २ ते ३ हजार हमीभाव द्यावा तसेच प्रति क्विंटल १५०० रुपये अनुदान द्यावे. नाफेडमार्फत कांदा खरेदी सुरू करावी. केंद्र सरकारशी समन्वय साधून दीर्घकालीन स्थिर निर्यात धोरण लागू करावे अशा अनेक मागण्याशेतकऱ्यांकडून केल्या जात आहेत. राज्यात कांद्याचे दर कोसळल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे, यावर मंत्री राधाकृष्ण विखेंनी सांगितले की आखाती देशात युद्ध असतांना देखील सरकारने कुठलीही निर्यात बंदी ठेवलेली नाही. मात्र जगाचे संपूर्ण अर्थकारण एका हॉर्मोसवर थांबलेले आहे. मुंबई बंदरामध्ये किती शेतीमाल पडून असून, कांद्याचे दर कोसळले हे चिंतेची बाब आहे, या संदर्भात सरकार नक्कीच विचार करेल. परंतु आज निर्यात बंदी नसतानाही आखाती देशात उद्भवलेल्या परिस्थितीला आपल्या सगळ्यांना सामोरें जावे लागेल, अशी प्रतिक्रिया जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली आहे.




### महत्वाच्या घटना

१६०२ : डच ईस्ट ईंडिया कंपनीची स्थापना
१७३९ : नादिरशहाने दिल्ली लुटली. मयूरासनासहित नवरत्ने लुटून इराणला पाठविली.
१८५४ : रिपब्लिकन पार्टी ऑफ अमेरिका या पक्षाची स्थापना झाली. या पक्षाला 'ग्रँड ओल्ड पार्टी' असेही म्हणण्यात येते.
१९०४ : चर्च ऑफ इंग्लंडचे पुजारी चार्ल्स फ्रीर अँड्र्यूज महात्मा गांधी यांच्या सोबत स्वातंत्रता आंदोलनामध्ये भाग घेण्यासाठी भारतात आले होते.
१९१६ : अल्बर्ट आइनस्टाइनने सापेक्षतावादाचा सिद्धांत प्रसिद्ध केला.
१९१७ : महाडचा चवदार तळे सत्याग्रह सुरु झाला.
१९२७ : डॉ. बाबासाहेब अंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली महाडच्या चवदार तळ्यावरील सत्याग्रह.
१९५६ : ट्युनिशियाला (फ्रान्सकडून) स्वातंत्र्य मिळाले.
१९६६ : लंडन येथील वेस्टमिनिस्टर च्या सेंट्रल मध्ये प्रदर्शनी करिता ठेवण्यात आलेल्या फुटबॉल वर्ल्ड कप ची चोरी करण्यात आली होती.
१९८२ : फ्रांसने परमाणु शास्त्राची चाचणी केली.
२०१५ : सूर्यग्रहण, रात्र व दिवस सारखा असण्याचा काळ, आणि चंद्र पृथ्वीच्या सगळ्यात जवळ येणे हे सर्व एकाच दिवशी झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६१५ : मुघल बादशाहा शहाजहा व पत्नी मुमताज महल यांचे सर्वात थोरले पुत्र दारा शिकोह यांचा जन्म.
१८२८ : हेन्रिक इब्सेन नॉर्वेजियन नाटककार, दिग्दर्शक आणि कवी (मृत्यू: २३ मे १९०६)
१९०८ : सर मायकेल रेडग्रेव्ह, ब्रिटिश अभिनेता (मृत्यू: २१ मार्च १९८५)
१९२० : वसंत कानेटकर, नाटककार.
१९२१ : भारतीय प्रशासकीय सेवेचे माजी अधिकारी पडिनजरेतकालकल चेरियन अलेक्झांडर यांचा जन्मदिन.
१९३९ : माजी भारतीय प्रथम श्रेणी क्रिकेट खेळाडू एच.एच. जामसाहेब शत्रुसूर्यासिंह जडेजा यांचा जन्म राजस्थान येथे झाला होता.
१९५१ : माजी भारतीय क्रिकेटपटू आणि भारतीय राष्ट्रीय क्रिकेट प्रशिक्षक मदनलाल उधौरम शर्मा यांचा जन्मदिन.
१९५२ : माजी भारतीय टेनिसपटू आणि व्यावसायिक आनंद अमृतराज यांचा जन्मदिन.
१९६६ : अलका याज्ञिक, पार्श्वगायिका
१९७३ : पहिले भारतीय खेळाडू अर्जुन अटवाल यांचा जन्मदिन.
१९८७ : कंगना राणावत, सिनेकलाकार


### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३५१ : लहरी सुलतान मुहम्मद बिन तुघलक.
१७२७ : सर आयझॅक न्यूटन इंग्लिश भौतिकशास्त्रज्ञ, गणितज्ञ व खगोलशास्त्रज्ञ. गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत मांडला. गणितातील 'कॅल्क्युलस' या शाखेचे जनक (जन्म: २५ डिसेंबर १६४२)
१९२५ : लॉर्ड कर्झन ब्रिटिश मुत्सद्दी आणि भारताचे व्हॉइसराय (जन्म: ११ जानेवारी १८५९)
१९५६ : बा. सी. मर्ढेकर मराठी नवकाव्याचे प्रणेते (जन्म: १ डिसेंबर १९०९)
१९७० : माजी भारतीय हॉकी खेळाडू जयपालसिंग मुंडा यांचे निधन.
२०१४ : भारतीय पत्रकार आणि लेखक खुशवंत सिंग यांचे निधन. (जन्म: २ फेब्रुवारी १९१५)

## 'ही' आहेत कोणत्याही वातावरणात वाढू शकणारी हवामान प्रतिरोधक पिके!

दुष्काळ, उष्णतेच्या लाटा आणि पूर यासारख्या नैसर्गिक घटकांचा राष्ट्रीय अन्नसुरक्षेवर परिणाम होतो. विशेषत: लहान शेतकऱ्यांना यामुळे मोठे नुकसान सहन करावे लागते. अशावेळी हवामानास अनुकूल पिके जी नैसर्गिक आपत्तिला सुद्धा तोंड देऊ शकतील अशा पिकांची निवड करणे हे अन्नसुरक्षा आणि शाश्वत शेतीची दृष्टीने गरजेचे आहे.

हवामान प्रतिरोधक पिके : हवामान बदलाच्या परिणामांशी जुळवून घेण्यासाठी हवामानास अनुकूल पिके निवडणे हे एक आवश्यक धोरण आहे. ही पिके पाण्याची वाढीव कार्यक्षमता, पोषक तत्वांची समृद्धता आणि जमिनीची सुधारणा यासह अनेक फायदे देतात, ज्यामुळे त्यांना शाश्वत शेतीसाठी मौल्यवान समजले जाते.



ज्वारी : दुष्काळी प्रतिकारशक्ती आणि अनुकूलतेसाठी ज्वारी हे महत्त्वाचे पीक आहे. खोल मुळे यामुळे दुष्काळी भागातही या पिकांची वाढ चांगली होते. प्रथिने, फायबर आणि खनिजे युक्त हे ग्लूटेन-मुक्त धान्य पचनासंबंधी आजार असणार्यांसाठी योग्य आहार आहे. याचा वापर धान्य, पशुआहार तसेच जैवइंधनामध्ये केला जातो. भरपूर सूर्यप्रकाश वातावरणात आणि पाण्याचा चांगला निचरा होणा-या विविध प्रकारच्या मातीत हे पीक चांगले येते.

बाजरी : हे पीक अत्यंत प्रतिकूल हवामान आणि जमिनीत सुद्धा घेता येते. हे धान्य प्रथिने, फायबर आणि खनिजांनी समृद्ध आहेत आणि त्यांचा कमी ग्लायसेमिक निर्देशांक यामुळे रक्तातील साखरेचे नियंत्रण करण्यास मदत करते. कमी कालावधीत येणारे पीक असल्यामुळे वर्षभरात जास्त वेळी येते. कमीतकमी सिंचन, चांगली निचरा होणाऱ्या वालुकामय चिकणमातीमध्ये हे पीक वाढतात.

रताळे : व्हिटॅमिन ए आणि सी, फायबर आणि अँटिऑक्सिडंट्सने समृद्ध रताळे हे कंदफळ रोगप्रतिकारक आणि आरोग्य आणि पचनासाठी चांगले आहे. दुष्काळ सहन करणारे हे पीक विविध प्रकारच्या मातीत आणि हवामानात चांगले वाढतात. उबदार तापमान, चांगल्या निचर्याची वालुकामय जमिनीत लागवड करता येते.

राजगिरा : खाण्यायोग्य पाने आणि बिया यामुळे राजगिरा एक पौष्टिक वनस्पती आहे. उष्ण तापमान आणि आणि दुष्काळी परिस्थितीत हे पीक घेता येते. बिया प्रथिनांचा चांगला स्रोत असून पाने जीवनसत्त्वे आणि खनिजे यांनी समृध्द असतात. हे पीक खराब मातीतही चांगले वाढते. पाण्याचा चांगला निचरा होणारी जमीन आणि भरपूर सूर्यप्रकाश या पिकासाठी योग्य आहे.

क्विनोआ : क्विनोआ हे एक सुपरफूड आहे, ज्यामध्ये प्रथिने, फायबर आणि आवश्यक खनिजे जास्त आहेत. क्विनोआ हे दुष्काळ ते ओल्या उष्णकटिबंधीय प्रदेशांसह विविध परिस्थितीमध्ये वाढू शकते. चांगला निचरा होणारी, वालुकामय चिकणमाती आणि भरपूर सूर्यप्रकाश या पिकासाठी चांगले असते.चवळी : चवळी हे दुष्काळ-प्रतिरोधक पीक आहे जे उष्ण, कोरड्या हवामानास अनुकूल आहे. हे पीक जमिनीत नत्राचे स्थिरीकरण करून मातीची सुपीकता वाढवते. चवळी पिकाला भरपूर सूर्यप्रकाश आणि पाण्याचा निचरा होणारी जमीन चांगली मानवते. कमीतकमी सिंचनामध्ये सुद्धा हे पीक चांगले येते. दुष्काळी प्रदेशात शाश्वत शेतीसाठी हे उत्कृष्ट पीक आहे.

अळू : अळू हे ओल्या आणि कोरड्या अशा दोन्ही परिस्थितीत वाढते. ज्यामुळे पाणी साचलेल्या जमिनीतही हे पीक घेता येते. हे पीक कार्बोहायड्रेट्स, फायबर, आवश्यक जीवनसत्वे आणि खनिजे यांनी समृद्ध आहे. हे पीक ओलसर, चांगला निचरा होणारी माती आणि उबदार हवामान पसंत करते. चांगली वाढ होण्यासाठी नियमित सिंचनाची गरज असते.कॅक्टस : कॅक्टस ही वनस्पती अत्यंत कोरड्या परिस्थितीत येते. रखरखीत वाळवंटात सुद्धा हे पीक घेता येते. कॅक्टीचा एक महत्त्वाचा फायदा म्हणजे त्यांच्या ऊतींमध्ये पाणी साठवण्याची क्षमता, ज्यामुळे त्यांना दुष्काळाच्या कालावधीत सुद्धा टिकून राहता येते.

काही जाती, जीवनसत्वे, अँटिऑक्सिडंट्स आणि आहारातील फायबरने समृद्ध असलेली खाद्य फळे तयार करतात, जे पौष्टिक आहेत. कमी देखभाल खराब मातीच्या परिस्थितीत हे पीक वाढण्यास सक्षम असतात. चांगल्या लागवडीसाठी कॅक्टीला चांगली निचरा होणारी माती आणि भरपूर सूर्यप्रकाश आवश्यक आहे. पाणी साचू नये म्हणून ते सामान्यत: कुंडीत किंवा गादी वाफे यावर उगवले जातात.

क्लोव्हर/रानमेथी : क्लोव्हर हे जमिनीत नत्राचे स्थिरीकरण करून मातीचे आरोग्य सुधारते. विविध परिस्थितींशी जुळवून घेणारे हे पीक चारापिक, कव्हर पीक आणि हिरवळीचे खत म्हणून वापरले जाते. क्लोव्हर हे दुष्काळ-सहिष्णु पीक पाण्याचा निचरा होणाऱ्या जमिनीत वाढते. नियमित पेरणी केल्याने चारा पीक म्हणून वापरता येते. हे सिंथेटिक रासायनिक खतावरील अवलंबन कमी करते.

हरभरा/चना : चना किंवा गार्बेन्झो बीन्स, कोरड्या हवामानात आणि पोषक नसलेल्या मातीत वाढतात. ते प्रथिने, फायबर आणि आवश्यक पोषक तत्वांनी समृद्ध आहेत. हे पीक नत्र स्थिरीकरणाद्वारे जमिनीची सुपीकता सुधारतात. उत्तम निचरा होणारी माती आणि भरपूर सूर्यप्रकाश या पिकाला मानवते. वाढत्या हंगामात मध्यम सिंचनाची गरज असते.

राज्य लोकतंत्र मराठवाडा वृत्तांत

# गुणवंताच्या सत्कारासाठी विद्यार्थी व पालकांनी नोंदणी करावी-हस्तीमल बंब

जालना । प्रतिनिधी

भारतीय जैन संस्था जालना च्या वतीने महत्वपूर्ण बैठकीचे आयोजन अध्यक्ष हस्तीमलजी बंब यांच्या मार्गदर्शना खाली घेण्यात आली. त्यावेळी प्रास्ताविक करताना बंब म्हणाले प्रतिवर्षानुसार गुणवंताचा सत्कार येत्या ७ जून रविवार रोजी सकाळी १०:०० वाजे पासुन, जैन भवन, सकलेचा नगर, जालना येथे आयोजित करण्यात येत आहे.

भव्य समारोहची पुर्व तैयारीसाठी आजच्या या बेठकीचा मुख्य उद्देश आहे. यात जैन, अग्रवाल, माहेश्वरी, ब्राम्हण, खंडेलवाल समाजातील व राजस्थानी समाजातील विद्यार्थी-विद्यार्थीनी सहभागी होऊ शकतात. कक्षा ८ वी, १० वी १२ ची व त्यापुढे स्तानक, स्तानकोत्तर, स्पर्धात्मक परिक्षा डॉक्टर, वकील, इंजिनियर इ. परिक्षा मध्ये उच्च गुण ७५% व त्या पेक्षा जास्त गुण प्राप्त केलेले विद्यार्थीयाचा अभिनंदन पत्र, पुष्पगुच्छ प्रदान करुन मान्यवराच्या हस्ते सत्कार करण्यात येईल.



तसेच विद्यार्थीयांच्या भविष्यासाठी १० वी / १२ वी नंतर काय ? देशाचे सुप्रशिद्ध प्रख्यात मोटीवेटर, करिअर मार्गदर्शक नागपुर येथील प्रा. डॉ. श्री नरेंद्र भुसारी हे सखोळ मार्गदर्शन करतील मुलांसाठी कला, वाणिज्य, विज्ञान क्षेत्रातील अवसर, वर्तमान काळात उपलब्ध करिअर विकल्प, २०२६ च्या वाढत्या करिअर जे आपल्याला यश प्रदान करु शकते, ''कसे बनवाल युक्कांना प्रभावशाली'', स्पर्धा टेक्नोलॉजीच्या युगात विद्यार्थी यांनी कोणत्या शैक्षणिक क्षेत्राची निवड करावी, कोण-कोणते क्षेत्र भविष्यासाठी उपलब्ध आहे, कोणत्या महाविद्यालयची, वस्तिगृहाची निवड करावी असे अनेक प्रश्नावर श्री भुसारी मार्गदर्शन करतील या भव्य समारोहचे उद्घाटन सुप्रसिध्द खंडेलवाल ज्वेलर्स चे प्रमुख व शिक्षण सम्राट श्री नितीन खंडेलवाल यांच्या शुभ हस्ते करण्यात येईल असे बंब म्हणाले. नरेन्द्र मोदी, सुदेश सकलेचा, सतिष पंच, विजय राठी, रामनिवास गोड, अशोक मिश्रा, अर्जुन खंडेलवाल यांनी आपले विचार मांडले. या बैठकीत नितीन नवलखा, विनोद बंब, सतिष बोथरा, बसंतीलाल गोलेच्छा, अशोक दहातोंडे, गिरीष जोशी, ओम दोंडके, आशिष जैन आदि उपस्थित होते. शेवटी श्री बंब यांच्या हस्ते नोंदणी फॉर्म वितरण करण्यात आले. व १ जुन पर्यंत विद्यार्थ्यांनी, त्यांच्या पालकांनी नोंदणी करुन आपल्या भविष्यासाठी करिअर बद्दल मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा व सत्कार स्विकारावा असे आव्हान अध्यक्ष हस्तीमलजी बंब यांनी केले आहे. या बैठकीचे सुत्र संचालन ॲड. अभय सेठिया यांनी केले तर आभार विजयराज सुराणा यांनी मांडले.

## सरकारच्या धोरणांविरोधात जामखेडमध्ये कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे आंदोलन



जामखेड । प्रतिनिधी

कांद्याला मिळत असलेल्या कवडीमोल दरामुळे संतप्त झालेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी जामखेडमध्ये आंदोलन करत सरकारच्या धोरणांविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. सरकारने तातडीने हस्तक्षेप करून कांद्याला हमीभाव द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली यावेळी राष्ट्रवादी कॉँग्रेस शरद पवार पक्षाचे व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी आंदोलकांनी कांद्याची माळ घालून आंदोलन करण्यात आले.

आंदोलक शेतकऱ्यांनी सांगितले की, सरकारच्या चुकीच्या निर्यात धोरणांमुळे कांद्याच्या बाजारभावात मोठी घसरण झाली आहे. उत्पादन खर्च सातत्याने वाढत असताना बाजारात मिळणारा दर अत्यंत कमी असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. अनेक ठिकाणी कांद्याला मिळणारा दर हा उत्पादन खर्चापेक्षाही कमी असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची भावना आहे. यावेळी आंदोलकांनी बाजार समित्यांमार्फत सर्व कांद्याची २५ रुपये प्रतिकिलो दराने खरेदी करावी, यापूर्वी विक्री झालेल्या कांद्यालाही अनुदान द्यावे तसेच कांदा निर्यातीवरील निर्बंध हटवावेत, अशी मागणी केली.

''शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकार सातत्याने दुर्लक्ष करत आहे. वेळेत निर्णय घेतला नाही तर येणाऱ्या काळात आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल,'' असा इशारा आंदोलक शेतकऱ्यांनी दिला. या आंदोलनात स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने कांदा उत्पादक शेतकरी सहभागी झाले होते. आंदोलनादरम्यान सरकारविरोधात घोषणाबाजी करण्यात आली तसेच प्रशासनाला मागण्यांचे निवेदन.

## उमरगा बसस्थानकामध्ये शेडची जागा पुरेना

### प्रवाशांना झाडांखाली घ्यावा लागतोय अडोसा

उमरगा। प्रतिनिधी

उमरगा शहर हे महाराष्ट्र कर्नाटक सीमे वरील शेवटचे शहर असून येथील बाजारपेठ नेहमी गजबज लेली असतें. हे शहर राष्ट्रीय महामार्ग्गांवर असल्याने येथील बसस्थान कामध्ये नेहमी गर्दी असते. काही दिवसा्वीं उमरगा बसस्थ नकाची इमारत पाडण्यात आली असून नवीन इमारतीचे काम करण्यात येणार आहे. परंतु सद्य स्थितीत प्रवाशांना अपुऱ्या सोयीमुळे प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. उमरगा तालुक यातील नागरि कांचा बहुतांश गावांचा दररोज संपर्क उमरगा शहरांशी येतो. उमरगा तालु चाव चाव लोहारा, निलंगा व औसा तसेच महाराष्ट्र कर्नाटक सीमावर्ती भागातील विद्यार्थी, नागरिक व हॉस्पि टलसाठी उमरगा येथे येत असतात. उमरगा हे मोठी बाजारपेठ असल्याने येथील बसस्? थानक नेहमी गजबज लेले असते.

उमरगा बसस्थ नकाची इमारत कसलीही पर्यायी व्यवस्था न करता पाडण्यात आली आहे. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने व उन्हाचा भयंकर उकाडा असल्याने प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. प्रवाश ांसाठी एक तात्पुरते पत्र्याचे शेड उभार ण्यात आले असले तरी त्या निवार्? ामध्ये केवळ ३० ते ४० प्रवासी बसू शकतील अशी व्यवस्था सुद्धा करण्यात आलेली नाही. उन्हाच्या तडाख्याने त्या शेडमध्ये प्रवाशांचे हाल होत आहेत. परिसरात असले ल्या दोन झाडाच्या सावली मध्ये कसे बसे गर्दीत बसून प्रवाशी बसची वाट पाहत ताटकळत बसत आहेत. बसस्? थानक परिसरात तात्पुरत्या स्वरूपात पाण्याची टाकी बसवून पिण्याच्या पाण्याची सोय करणे अपेक्षित असताना कसलीही पाण्याची सोय न केल्याने कडक उन्हामध्ये प्रवाशांचे हाल होत आहेत. बसस्? थानक परिसरात तात्पुरत्या स्वरूपात प्लॅटफॉर्म उभा करणे अपेक्षित होते. परंतु तसे काहीही न केल्याने बसला नाम फलक नसल्याने प्रवासी थेट चालक व वाहक ंकडे चौकशी करत आहेत. महिला प्रवाशांची अधिक अडचण उमरगा बसस्थानकातील सध्याची परिस्थिती अत्यंत अमानुष झाली आहे. पर्यायी व्यवस्था नसताना बसस्थानक पाडल्याने प्रवाशांना उन्हात उभे राहावे लागत आहे. पिण्याचे पाणी, सावली, स्वच्छतागृहे यांचा अभाव आहे. त्यातच बसेस वारंवार बंद पडणे, नियोजित फेऱ्या रद्द होणे आणि वेळापत्रकाचा बोजवारा उडाल्याने विद्यार्थी, रुग्ण, महिला व ग्रामीण प्रवासी प्रचंड त्रस्त झाले आहेत. -ॲड. शीतल चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते नाममात्र निधी वापरून प्रवाशांची दिशाभूल शासनाकडून तात्पुरत्या स्वरूपात प्रवासी निवारा व प्रवाशांच्या सोयीसाठी आलेला निधी नेमका किती होता व किती खर्च करण्यात आला हे महत्वाचे आहे. नाममात्र निधी खर्च करून प्रवाशांना अपुऱ्या सोयी-सुविधा देऊन प्रशासन प्रवाशांची दिशाभूल तर करत नाही असा सवाल नागरिक करत आहेत. प्रवाशांना चांगल्या सोयी सुविधा पुरवणे हे एसटी प्रशासनाचे कर्तव्य असताना असे बेजबाबदारपणे प्रवाशांचे हाल करणाऱ्या अधिकाऱ्यांना शासन आणखी किती काळ पोसणार आहेत.

## वैजापूर तालुक्यात डिझेल-पेट्रोलची टंचाई

### टँकर आल्यावर काही तासांतच संपतो स्टॉक; पंपांवर कॅन घेऊन शेतकऱ्यांची गर्दी, भर उन्हात रांगा

दहेगाव। प्रतिनिधी

जागतिक बाजारपेठेत निर्माण झालेला इंधन आणि गॅसचा तुटवडा आता थेट भारताच्या ग्रामीण भागापर्यंत पोहोचला असून, याचे पडसाद छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यात उमटू लागले आहेत. खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचतीचे आवाहन करत परदेशी पर्यटन आणि सोने खरेदी टाळण्याचे संकेत दिल्यानंतर, स्थानिक पातळीवर पेट्रोल-डिझेलच्या किमतीत झालेली वाढ आणि तुटवड्यामुळे सामान्य नागरिकांचे आर्थिक बजेट कोलमडले आहे.

गेल्या १५ दिवसांपासून वैजापूर तालुक्यातील ग्रामीण भागात डिझेलचा मोठा तुटवडा जाणवत आहे. नागपूर-मुंबई राष्ट्रीय महामार्गावरील बोर दहेगाव परिसरातील गोळवाडी येथील साई संकेत पेट्रोल पंपावर मंगळवारी सकाळी हृदयद्रावक दृश्य पाहायला मिळाले. डिझेल मिळवण्यासाठी



पहाटेपासूनच शेतकरी आणि वाहनधारकांनी मैलोन्मैल लांब रांगा लावल्या होत्या. भर उन्हात सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत लोक हातात कॅन घेऊन डिझेलच्या प्रतीक्षेत उभे होते. वाढती गर्दी पाहून पंप चालक संकेत पाटील मिसाळ यांनी कर्मचाऱ्यांच्या मदतीने सर्वांना सम प्रमाणात इंधन वाटप करून परिस्थिती हाताळली. सध्या ग्रामीण भागात खरीप हंगामापूर्वीची मशागत आणि नांगरणीची कामे वेगाने सुरू आहेत. ट्रॅक्टरच्या साहाय्याने ही कामे करण्यासाठी डिझेलची मोठी मागणी आहे. मात्र, वैजापूर ते लासूर स्टेशन दरम्यान असलेल्या ९ ते १० पेट्रोल पंपांवर इंधनाचा साठा अत्यंत मर्यादित असल्याने शेतीची कामे खोळंबली आहेत. इंधनासाठी शेतकऱ्यांना दोन-तीन दिवस भटकंती करावी लागत आहे. ऐन शेतीची पूर्व मशागतीची कामे करायची वेळ आहे. अशात पेट्रोल-डिझेलचा तुटवडा भासू लागला व त्यात भर म्हणून डिझेल व पेट्रोलचे दर पण वाढले आहे. पेट्रोल पंपावर डिझेल पेट्रोल मिळवण्यासाठी रांगा लावाव्या लागत आहे. तर काही वेळा दोन-तीन दिवस वाट पाहावी लागत आहे. सर्व पेट्रोल पंपावर भटकंती करावी लागत आहे. त्यामुळे शेतीचे काम खोलांबळी आहेत, अशी प्रतिक्रिया शेतकरी गोविद डिके यांनी दिली. पेट्रोल पंपचालक संकेत पाटील मिसाळ म्हणाले, आम्ही दिवसाआड आमच्या पेट्रोल पंपावर डिझेलचे टँकर उपलब्ध करत आहोत. पण डिझेलची विक्रमी मागणी वाढलेली असून, मनमाड येथून आलेले टँकर काही तासात खाली होत आहे. आम्ही नियोजन करून सर्व वाहनधारक व शेतकरी यांना सम प्रमाणात पेट्रोल-डिझेलचे वाटप करत आहोत. तरी पण पेट्रोल-डिझेलचा तुतवाडा जाणवत आहे. डिझेलची टंचाई केवळ वैजापूरपुरती मर्यादित नसून, संपूर्ण जिल्ह्यात कमी-जास्त प्रमाणात हीच स्थिती आहे. महामार्गावर धावणाऱ्या वाहनांच्या रांगांमुळे वाहतुकीलाही अडथळा निर्माण होत आहे. आगामी पावसाळ्यापूर्वीची शेतीची कामे पूर्ण होण्यासाठी सरकारने तातडीने इंधन कोटा वाढवून देण्याची मागणी स्थानिक शेतकरी करत आहेत.

## शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर शिवसेनेचा रास्ता रोको

### जालन्यात गळ्यात कांद्याच्या माळा घातलेल्या आंदोलकांनी वेधले लक्ष

जालना । प्रतिनिधी

सोमवारी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. छत्रपती संभाजी महाराज उद्यानासमोर आंदोलन झाले. गळ्यात कांद्याच्या माळा घातलेल्या आंदोलकांनी लक्ष वेधून घेतले. शासनाने शेतकऱ्यांचे प्रश्न तातडीने न सोडवल्यास शिवसेना स्टाइलने आंदोलन केले जाईल, असा इशारा देण्यात आला.



आंदोलनाचे नेतृत्व जिल्हाप्रमुख मनीष श्रीवास्तव, जिल्हाप्रमुख महेश नळगे, जिल्हा संघटक भानुदास घुगे, उपजिल्हाप्रमुख मुरलीधर शेजुळ, भगवानराव कदम, हनुमान धांडे, अशोक आघाव, परमेश्वर जगताप, जयप्रकाश चव्हाण, गणेश दराडे, महादेव काळे, शहरप्रमुख दीपक रणनवरे, महिला आघाडी जिल्हा संघटक रूपम रमेश घुगे यांनी केले. जिल्हाप्रमुख मनीष श्रीवास्तव, जिल्हा संघटक भानुदास घुगे, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख रूपम घुगे, शहरप्रमुख दीपक रणनवरे यांनी गळ्यात कांद्याची माळ घालून लक्ष वेधले. या वेळी केंद्र व राज्य सरकारविरोधात घोषणाबाजी झाली. आंदोलनामुळे काही वेळ वाहतूक ठप्प झाली. रास्ता रोकोनंतर शिवसेनेच्या शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांची भेट घेतली. मागण्यांचे निवेदन दिले. सरकारने लक्ष न दिल्यास पुढील आंदोलन शिवसेना स्टाइलने केले जाईल, असा इशारा श्रीवास्तव यांनी दिला.

## शहरात खंजर घेवुन फिरणाऱ्या गुन्हेगारास पोलिसांनी घेतले ताब्यात



जालना । प्रतिनिधी

जालना शहरात दिनांक १९.०५.२०२६ रोजी शिवकुमार कॉम्प्लेक्स अंन्नाभाऊ साठे पुतळया जवळ जुना जालना येथे ११२ कॉलव्दारे माहीती मिळाली की, एक व्यक्ती चाकु घेवुन कॉलरला मारहाण करण्यासाठी आलेला आहे असा कॉल प्राप्त झाल्याने ११२ अमलदार व बिट अमलदार असे बातमी मिळाल्यांचे ठिकाणी पोलीस पथक खाजगी व सरकारी वाहनाने रवाना होवुन सदर ठिकाणी ठिक ०९.४५ वाजता पोहचलो असता तेथे एक ईसम हातात सुरा घेवून कोणावरतरी प्राणघातक हल्ला करण्याच्या उददेशाने दहशत निर्मान करत होता व जोरजोरात ओरडत होता त्यास शिताफीने ताब्यात घेवुन त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव विरेंद्र लक्ष्मनराव खैरे वय ४२ वर्ष रा.मस्तगड हनुमान टेकडी जुना जालना असे असल्याचे सांगीतले. त्याची दोन पंचासमक्ष समक्ष झडती घेवून त्याच्या हातातील धारदार पाते असलेला लोखंडी खंजर मिळून आला त्याचे वर्णन खालीलप्रमाणे, (१) ३००/- रुपये किमतीचा चिकटपटटी लावलेली मुठ असलेला धारदार पाते असलेला सुरा ज्याची एकुन लांबी ४५ सेंमी कि.अं. जप्त करण्यात आला असुन संजय शेषराव चव्हाण, वय ३७ वर्षे, व्यव नोकरी, पोकों/७७३, कदीम जालना पोलीस ठाणे, याच्या फिर्यादीवरुन कदीम जालना पोलीस ठाणे गु.रं.नं. २५१/२०२५ भारतीय शस्त्र अधीनियम १९५९ चे कलम ४/२५ प्रमाणे गुन्हा नोंद करुन कार्यवाही केलेली आहे. सदरची कारवाई मा.श्री. तेघबीरसींग संधु, पोलीस अधीक्षक जालना, मा.श्री. अनंत कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधीकारी जालना यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.जे.बी. शेवाळे, पोलीस निरीक्षक, कदीम जालना पोलीस ठाणे, पोना/किरण चेके, पोकों/ संजय चव्हाण, पोकों/ किशोर तराळ, पोकों/उमेश साबळे, सर्व नेमणुक कदीम जालना पोलीस ठाणे यांनी केली ही उल्लेखनिय कार्यवाही केली आहे.


जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-१०८६**
**दिनांक - २७/१०/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती प्रल्हाद एकनाथ सुकदेव रा.गोंदी ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | काजल प्रल्हाद सुकदेव | मुलगी | १३/१२/२००९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-१०८८**
**दिनांक - २७/१०/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती प्रल्हाद एकनाथ सुकदेव रा.गोंदी ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगा जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | विशाल प्रल्हाद सुकदेव | मुलगा | १३/०६/२०१४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-१०८७**
**दिनांक - २७/१०/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती प्रल्हाद एकनाथ सुकदेव रा.गोंदी ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगा जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | पवन प्रल्हाद सुकदेव | मुलगा | २६/०२/२०१२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# वीज वितरण अधिकाऱ्यांची बोगसगिरी उघड

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील विज वितरण कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बोगसगिरी आता उघड होऊ लागली असून निकृष्ट दर्जाचे ट्रांसफार्मर वापरल्याने आणि इतर साहित्यही बोगस असल्याने दहा मिनिटेही वीज टिकत नाही. सध्या कडक उन्हाळ्यात नागरिक उकाड्याने हैराण झाले असून दिवसाही आणि रात्रीही कधीही वीज गायब होते. रात्री कधीही ट्रांसफार्मर गरम होऊन उडतो. हा प्रकार वारंवार होत असून यामागे वीज वितरण कंपनीच्या अधिकारी आणि ठेकेदारांची बोगसगिरीच असल्याचे आता उघड होऊ लागले आहे. निकृष्ट दर्जाचे ट्रांसफार्मर वापरून आतापर्यंत वेळ मारून नेली. मात्र आता विजेची टंचाई पाहता हा निकृष्टपणा हळूहळू चव्हाट्यावर येत आहे.



याप्रकरणी चौकशी होऊन दोशी अधिकारी आणि ठेकेदारावर कारवाई व्हावी अशी मागणी आता ग्राहकातून होत आहे.

गेल्या काही दिवसापासून वीज वितरण कंपनीच्या कारभारामध्ये भ्रष्टाचार बोकाळला असून वीज वितरण कंपनीतील अधिकारी आणि ठेकेदारांच्या संगनमताने अनेक बोगस वस्तूंचा पुरवठा कंपनीला

## शहरामध्ये प्रत्येक दहा मिनिटाला वीज गायब

केला जात आहे. आतापर्यंत फारशी वीस टंचाई नसल्याने हा सर्व प्रकार झाकून गेला. मात्र आता उन्हाळ्याचे दिवस असल्याने आणि विजेची मागणी वाढल्याने निकृष्ट दर्जाचे ट्रान्सफॉर्मर धडाधड उडू लागले आहेत. याबरोबरच निकृष्ट दर्जाचे इतर साहित्यही आता या विजेच्या लोड समोर टिकू शकत नाहीत. अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. वीज वितरण कंपनी ग्राहकांकडून मोठ्या प्रमाणात विजेची बिले वसूल करते. अनेक ठिकाणी अव्वाच्या सव्वा विज बिले देऊन विज बिले वसूल केली जातात. याची तक्रार करायला गेले तर पैसे अगोदर भरा. नंतर रीडिंगचे पाहू असा दम दिला जातो. बिल भरले नाही तर वीज कनेक्शन बंद करण्याचा दमही दिला जातो. असे प्रकार वारंवार चालू आहेत. वरिष्ठ स्तरावर मात्र सर्व आऑलवेल असून वीज वितरण कंपनीला लागणारे ट्रांसफार्मर, फ्यूज, डीओ, तारा या निकृष्ट दर्जाच्या वापरल्या जात आहेत. कॉपर वायरच्या ट्रांसफार्मर चे बिल वसूल करून ॲल्युमिनियमच्या वायरचे ट्रान्सफॉर्मर वितरित केले जात आहेत.हा प्रकार अनेक दिवसापासून चालू असून प्रत्यक्षात मात्र याकडे कोणाचेही लक्ष नसल्याने आतापर्यंत हे झाकून गेले. मात्र आता विजेची ◀◀ पान ३ वर

## आमदारांनी लक्ष घालावे

बीड शहरामध्ये वारंवार जाणारी वीज आणि होत असलेला त्रास याबाबत आमदार संदीप क्षीरसागर यांनी वीज वितरण कंपनीच्या कारभाराबाबत जरा खोलात जाऊन चौकशी करावी आणि यांचे नेमके काय चालू आहे. याचा आढावा घ्यावा शेवटी नागरिकांना वीज वेळेत उपलब्ध होणे गरजेचे आहे आणि लोकप्रतिनिधी म्हणून आपली ही ती जबाबदारी आहे.

## कारभार सुधारा नाहीतर...

कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सध्या चालू असलेला विजेचा लपंडाव थांबवला नाही तर लोक आता सरळ कार्यालयात येऊन अधिकाऱ्यांची हजामत करतील. याचे भान ठेवून अधिकाऱ्यांनी आता या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन कारभार सुधारावा अशी अपेक्षा ग्राहकांची आहे.

# अंबाजोगाईचे भूलतज्ज्ञ डॉक्टर तरकसे यांचा साठवण तलावात बुडून मृत्यू

अंबाजोगाई । प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील अत्यंत महत्त्वाच्या विभागाचे सुप्रसिद्ध भूलतज्ञ विभागप्रमुख डॉ. अभिमन्यू तरकसे यांचा काळवटी साठवण तलावात बुडून मृत्यू झाला. ही धक्कादायक घटना मंगळवारी दि. १९ मे रोजी सकाळी ६.३० च्या दरम्यान घडली. या घटनेमुळे वैद्यकीय क्षेत्रासह अंबाजोगाई शहरात



हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, डॉ. अभिमन्यू तरकसे हे दररोजप्रमाणे सकाळी पोहण्यासाठी काळवटी साठवण तलाव परिसरात गेले होते. पोहत असताना अचानक त्यांना हृदयविकाराचा झटका आल्याने ते पाण्यात बुडाले, अशी प्राथमिक माहिती सूत्रांकडून मिळत आहे. घटनेची माहिती समोर येताच परिसरात एकच खळबळ उडाली. स्थानिक नागरिकांनी व संबंधितांनी तत्काळ मदतकार्य सुरू केले. मात्र, त्यांना वाचविण्यात अपयश आले.

डॉ. अभिमन्यू तरकसे हे ‘स्वाराती’ मधील अनुभवी व कर्तव्यदक्ष डॉक्टर म्हणून परिचित होते. त्यांच्या अकाली निधनामुळे वैद्यकीय क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असून, सहकारी डॉक्टर, कर्मचारी व मित्रपरिवारांकडून शोक व्यक्त करण्यात येत आहे. अंबाजोगाई जवळील धावडी गावचे रहिवासी असलेले डॉ. अभिमन्यू तरकसे यांचे ◀◀ पान ३ वर

# छत्रपती संभाजी महाराजांची जयंती साजरी न करणाऱ्या ग्रामपंचायतीचा अहवाल सार्वजनिक करा

### संभाजी ब्रिगेडच्या वतीने गटविकास अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती राज्यभर मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.मात्र माजलगाव तालुक्यातील काही ग्रामपंचायतींमध्ये जयंती साजरी करण्यात आली नसल्याची माहिती समोर आल्याने छत्रपती संभाजी महाराजांची जयंती साजरी न करणाऱ्या ग्रामपंचायतीचा अहवाल सार्वजनिक करण्याची मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने दि १९ मे मंगळवार रोजी माजलगाव पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

यासंदर्भात संभाजी ब्रिगेडच्या वतीने दि १९



मे मंगळवार रोजी पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, माजलगाव तालुक्यातील ज्या ग्रामपंचायतींमध्ये छत्रपती संभाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली आहे,व ज्या ग्रामपंचायतींमध्ये छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली नाही,याचा सविस्तर अहवाल सार्वजनिक करावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तसेच ज्या ग्रामपंचायतींमध्ये जयंती साजरी करण्यात आली नाही, त्या संबंधित ग्रामसेवक,सरपंच व जबाबदार अधिकाऱ्यांवर तात्काळ प्रशासकीय कारवाई करावी, अन्यथा संभाजी ब्रिगेडच्या वतीने तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आला आहे. यावेळी संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष तुकाराम नावडकर, शहराध्यक्ष परमेश्वर आडगळे,तालुका उपाध्यक्ष लक्ष्मण काशीद,सतोष खडागळे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# नीट पेपरफुटी प्रकरणी सूत्रधारांवर कडक कारवाई करा : एसएफआय

## वडवणी तहसील कार्यालयावर एसएफआयचे पेपरफुटी विरोधात तीव्र आंदोलन

वडवणी । प्रतिनिधी

वैद्यकीय प्रवेशासाठी रात्रंदिवस मेहनत करणाऱ्या सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या स्वप्नाची केंद्र सरकारने क्रूर थट्टा केली आहे. नीट परीक्षेतील पेपरफुटी आणि निकालातील संशयास्पद बाबीमुळे देशातील शिक्षण व्यवस्था पूर्णपणे कोसळल्याचे स्पष्ट झाले असून हा केवळ घोटाळा नसून प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांची दिवसाढवळ्या झालेली लूट



आहे. शैक्षणिक संस्थांचे व्यापारीकरण करणाऱ्या धोरणामुळेच परीक्षांची नि पक्षता धोक्यात आली आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीने (छढ-) परीक्षेच्या गोपनीयतेचा अक्षरशा खेळ मांडला असून वारंवार होणाऱ्या पेपरफुटीमुळे ही संस्था

### एनटीए बरखास्त करा, केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा द्यावा, विद्यार्थी आक्रमक

विश्वासहर्ता पूर्णतः गमावून बसली आहे. या संस्थेवर बंदी घालण्याची मागणी अनेक वेळा झाली मात्र याची दखल न घेतल्यामुळे या वर्षी पुन्हा हा प्रकार झाला आहे. या गंभीर संकटाच्या पार्श्वभूमीवर डत्रख वडवणी च्या वतीने केंद्र सरकारच्या धोरणांचा व नाकर्तेपणाचा तीव्र निषेध करण्यात आला.

वडवणी तहसील कार्यालयावर एसएफआयच्या नेतृत्वात विद्यार्थ्यांनी तीव्र निदर्शने आंदोलन करून आपला रोष व्यक्त केला यावेळी विद्यार्थ्यांनी केंद्र सरकारच्या धोरणाच्या विरोधात घोषणाबाजी करत विद्यार्थी, पालकांना व समाजातील ◀◀ पान ३ वर

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी अक्षय मुंदडा यांना उमेदवारी देण्याची मागणी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

बीड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यात आगामी काळात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. या निवडणुकीत महायुतीकडून भाजपचे खंदे समर्थक आणि पनगेश्वर साखर कारखान्याचे चेअरमन अक्षय मुंदडा यांना संधी देण्यात यावी, अशी जोरदार मागणी आता सर्वसामान्य जनतेतून आणि कार्यकर्त्यांमधून होऊ लागली आहे.

मुंदडा कुटुंबियांचा इतिहास हा केवळ राजकारणाचा नसून तो समाजकारणाचा आणि




जनसेवेचा राहिला आहे. स्व. विमलताई मुंदडा यांच्या लोकसेवेचा वारसा, ज्येष्ठ नेते तथा अंबेजोगाईचे नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांचे मार्गदर्शन आणि आमदार नमिताताई मुंदडा यांच्या नेतृत्वाखाली मुंदडा परिवाराने नेहमीच सर्वसामान्यांच्या सुखादुःखात सहभाग घेतला आहे. अक्षय मुंदडा यांच्या रूपाने या घराण्याचा जनसेवेचा वारसा अधिक सक्षमपणे पुढे जात आहे.

अक्षय मुंदडा हे केवळ निवडणुकीपुरते मर्यादित नसून, बाराही महिने २४ तास जनतेच्या अडीअडचणीला धावून जाणारे नेतृत्व म्हणून ◀◀ पान ३ वर

# १ लाख ७७ हजार शेतकरी कुटुंबांच्या विम्यासाठी खासदार-आमदार कार्यालयांसमोर आंदोलन करणार - भाई थावरे

माजलगाव । प्रतिनिधी

२०२५ मधील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना जाहीर करण्यात आलेली विमा व नुकसानभरपाई रक्कम अद्याप मिळालेली नसल्याने बीड जिल्ह्यातील तब्बल १ लाख ७७ हजार ३५१ शेतकरी कुटुंबांचा प्रश्न आता आंदोलनाच्या टप्प्यावर पोहोचला आहे.याबाबत दि ०१ जून २०२६ रोजी बीड लोकसभेचे खासदार बजरंग सोनवणे यांच्या कार्यालयासमोर, तर ०८ जून २०२६ रोजी माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांच्या कार्यालयासमोर



निवेदन देऊन आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी दिली.

जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनानुसार,२०२५ मध्ये महाराष्ट्रासह बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली होती. बीड जिल्ह्यातील गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी जिल्ह्यासाठी विशेष बाब म्हणून प्रति हेक्टर १७,५०० रुपयांची मदत जाहीर केली होती. मात्र, घोषणेनंतरही शेतकऱ्यांच्या खात्यावर अद्याप कोणतीही रक्कम जमा झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

यापूर्वीही दि ०२ एप्रिल २०२६ रोजी प्रशासनाला स्मरणपत्र देण्यात आले होते, तसेच दि ०१ मे रोजी विविध ग्रामपंचायतींमध्ये जनजागृती मोहिमेद्वारे निवेदनेही सादर करण्यात आली होती. मात्र, यानंतरही प्रश्न मार्गी न लागल्याने आता लोकप्रतिनिधींकडे थेट दाद मागण्याचा निर्णय शेतकरी संघटनांनी घेतला आहे. शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी सांगितले की, बीड जिल्हा कायम दुष्काळ व अतिवृष्टीच्या ◀◀ पान ३ वर

# पाटोदा तालुक्यात शेतकरी मार्गदर्शन व प्रात्यक्षिक कार्यक्रम उत्साहात

पाटोदा । प्रतिनिधी

प्रकल्प संचालक आत्मा बीड सुभाष साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली पाटोदा तालुक्यातील काकडहिरा येथे राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान तसेच डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत शेतकरी गटांना भेट देऊन विविध प्रात्यक्षिके व मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी दादाराव जाधवर साहेब, (कृषी उपसंचालक), सुरज पाटील (प्रकल्प उपसंचालक आत्मा) यांनी उपस्थित राहून शेतकऱ्यांशी संवाद साधला. कार्यक्रमात दशपर्णी अर्क तयार करण्याचे प्रात्यक्षिक,



सोयाबीन उगम क्षमता तपासणी यांचे प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्यात आले. तसेच सामूहिकरीत्या नैसर्गिक शेतीची प्रतिज्ञा घेण्यात आली.

काकडहिरा येथे गांडूळ खत बेड, गांडूळ पाणी, गोकृपा अमृत आणि दशपर्णी अर्क तयार करण्यात आले असून त्याची माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली. जाधवर यांनी नैसर्गिक शेतीचे महत्त्व, निविष्ठा तयार करण्याच्या पद्धती, खरीप हंगामाचे नियोजन, विविध मोहिमा तसेच फार्मर कप याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. सुरज पाटील यांनी दशपर्णी अर्क, गोकृपा अमृत, जीवामृत, सोयाबीन उगम क्षमता तपासणी आणि बायोचार याविषयी शेतकऱ्यांना सखोल माहिती दिली. सदर कार्यक्रमासाठी अतुल आंधळे तालुका कृषी अधिकारी पाटोदा यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी प्र. मंडळ कृषी अधिकारी मिसाळ मॅडम, सहाय्यक कृषी अधिकारी श्रीमती विद्या बडे मॅडम, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक बी. आर. तांबडे, पाणी फाऊंडेशनचे घोलप, वॉटर संस्थेचे भरत कवठेकर, सूर्यवंशी तसेच गटातील शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अधिक मासानिमित्त पुरुषोत्तम पुरी मार्गावर जादा बसेस सोडण्याची मागणी


## भाविकांची वाढती गर्दी ;अपुऱ्या बसफेऱ्यांमुळे प्रवाशांची गैरसोय

माजलगाव । प्रतिनिधी

अधिक मासानिमित्त देशभरातील भाविकांचे श्रद्धास्थान ठरलेल्या पुरुषोत्तम पुरी येथे दर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर भक्तांची गर्दी होत असून, माजलगाव आगाराकडून पुरेशा बसफेऱ्या उपलब्ध होत नसल्याने भाविकांची मोठी गैरसोय होत असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त केली जात आहे.

देशातील भगवान पुरुषोत्तमाचे एकमेव मंदिर पुरुषोत्तम पुरी येथे असल्यामुळे महाराष्ट्रासह विविध





राज्यांमधून भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी येत आहेत. अधिक मासाच्या पार्श्वभूमीवर दिवसेंदिवस वाढणारी गर्दी लक्षात घेता सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर ताण वाढला आहे. मात्र, प्रवाशांच्या तुलनेत बसफेऱ्या अपुऱ्या पडत असल्याने भाविकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागत आहे.

विशेषतः सकाळच्या वेळेत दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांची संख्या अधिक असते. त्यामुळे सकाळी सहा वाजताच्या बसफेऱ्या नियमित आणि वेळेवर सुरू कराव्यात, तसेच अतिरिक्त बसेस उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी भाविक व नागरिकांनी केली आहे. बसस्थानक परिसरात महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मुलांसह प्रवास करणाऱ्या भाविकांची मोठी गर्दी होत असून, अनेकांना उभ्याने प्रवास करावा लागत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

बसफेऱ्या अपुऱ्या असल्याने काही खासगी वाहनधारकांकडून जादा भाडे आकारले जात असल्याच्याही तक्रारी पुढे येत आहेत. त्यामुळे भाविकांची आर्थिक लूट होत असल्याची नाराजी नागरिकांतून व्यक्त केली जात आहे.दरम्यान, भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी माजलगाव आगार प्रशासनाने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पुरुषोत्तम पुरी मार्गावर तातडीने जादा बसेस सोडाव्यात, तसेच बसस्थानक परिसरात आवश्यक सुविधा आणि योग्य नियोजन उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी नागरिक व भाविकांकडून करण्यात येत आहे.

# आ.धस यांच्या प्रयत्नातून नवजात बालकासाठी मुख्यमंत्री निधीतून ५० हजारांची मदत

पाटोदा । प्रतिनिधी

मतदारसंघातील सर्वसामान्य आणि गोरगरिबांच्या मदतीला धावून जाणारे 'आरोग्यदूत' आमदार सुरेश आण्णा धस यांच्या विशेष प्रयत्नातून एका नवजात बालकाला मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे. आष्टी तालुक्यातील जामगाव येथील सौ. स्वाती संदिपान धस यांच्या नवजात बालकाच्या उपचारासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून ५० हजार रुपयांची मदत मंजूर करण्यात आली आहे.जामगाव येथील संदिपान धस यांचे नवजात बालक सध्या अहिल्यानगर येथील सिद्धिविनायक हॉस्पिटलमध्ये उपचार घेत आहे. बालकावर पुढील शस्त्रक्रिया करण्यासाठी मोठा खर्च अपेक्षित होता. ही बाब जामगावचे माजी उपसरपंच संभाजी भागे यांनी आमदार सुरेश आण्णा धस यांच्या निदर्शनास आणून दिली.माहिती मिळताच आमदार धस यांनी तातडीने आरोग्य विभागाचे कामकाज पाहणारे विकासतात्या साळवे



यांना धस कुटुंबाला मदत मिळवून देण्याचे निर्देश दिले. सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून अवघ्या एका दिवसात ५० हजार रुपयांची रक्कम सिद्धिविनायक हॉस्पिटलच्या खात्यावर जमा करण्यात आली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महायुती सरकारच्या या तत्परतेमुळे बालकावर यशस्वी शस्त्रक्रिया पार पडली असून, सध्या बालकाची प्रकृती सुधारत आहे. ऐन अडचणीच्या काळात हक्काची आर्थिक मदत मिळाल्यामुळे धस कुटुंबाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महायुती सरकार आणि आमदार सुरेश आण्णा धस यांचे मनापासून आभार मानले आहेत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# ‘एमआयटी एडीटी’च्या विद्यार्थ्यांची ऐतिहासिक कामगिरी!

## भारतातील सर्वात मोठ्या रेडिओ-कंट्रोल्ड इलेक्ट्रिक विमानाची निर्मिती

पुणे : भारतीय विद्यार्थी संशोधन आणि एरोस्पेस नवोन्मेष क्षेत्रात ऐतिहासिक ठरणारी कामगिरी करत ‘एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी’ विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी भारतातील सर्वात मोठे रेडिओ-कंट्रोल्ड (आरसी) इलेक्ट्रिक फिक्स्ड-विंग विमान यशस्वीरीत्या डिझाईन, विकसित आणि उड्डाण केले आहे. ‘टीम स्कायट्रेक’ने विकसित केलेल्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला ‘प्रोजेक्ट गरुडा’ असे नाव देण्यात आले आहे.

‘एमआयटी एडीटी’ विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड सायन्स अंतर्गत एरोस्पेस इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांनी हे विमान पूर्णपणे स्वतः विकसित केले असून, या प्रकल्पासाठी ‘सेंटर फॉर रिसर्च, इनोव्हेशन अँड एंटरप्रेन्युअरशिप फॉर यंग ॲस्पिरंट्स’ मार्फत विद्यापीठाने अर्थसहाय्य केले आहे. ९.२५ मीटर एवढ्या विशाल विंगस्पॅनसह आणि २६१ किलो वजन असलेले हे विमान भारतात तयार झालेले सर्वात मोठे आणि सर्वाधिक वजनाचे रेडिओ-कंट्रोल्ड इलेक्ट्रिक विमान ठरले आहे. या प्रकल्पासाठी तब्बल ४८ लाख



रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता.यशस्वी उड्डाणानंतर या विमानाची आता ‘इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स’ व ‘आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स’मध्ये भारतातील सर्वाधिक वजनाचे आरसी विमान (२६१ किलो) आणि भारतातील सर्वांत मोठ्या विंगस्पॅनचे आरसी विमान (९.२५ मीटर) अशा विक्रमांसाठी नोंद झाली आहे.

एमआयटी एडीटी विद्यापीठात आयोजित पत्रकार परिषदेत ‘इंडिया व आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स’च्या अधिकाऱ्यांकडून ‘प्रोजेक्ट गरुडा’ला विक्रमाचे प्रमाणपत्र बहाल करण्यात आले. त्यामुळे पूर्णपणे विद्यार्थ्यांनी साकारलेला हा प्रकल्प अनुभवाधारित शिक्षण, प्रगत एरोस्पेस संशोधन आणि विद्यार्थी-केंद्रित नवोन्मेषाचे उत्कृष्ट उदाहरण ठरला आहे.

या प्रकल्पाला ‘एमआयटी एडीटी’ विद्यापीठाचे कार्याध्यक्ष तथा प्र-कुलगुरू प्रा. डॉ. मंगेश कराड यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच कुलगुरू डॉ. राजेश एस., प्रोवोस्ट डॉ. सायली गणकर, प्र-कुलगुरू (टेक्नॉलॉजी क्लस्टर) डॉ. रामचंद्र पुजेरी, प्र-कुलगुरू (इनोव्हेशन क्लस्टर) डॉ. मोहित दुबे, प्र-कुलगुरू (क्रिएटिव्ह क्लस्टर), कुलसचिव डॉ.महेश चोपडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. अभियांत्रिकी विभागाचे अधिष्ठाता डॉ. सुदर्शन सानप, एरोस्पेस विभागप्रमुख डॉ. कमलेश कुलकर्णी, डॉ. सुनील डिंगरे तसेच उठखएध-चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संतोष दराडे यांनी सातत्याने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी विमानाची रचना, स्ट्रक्चरल फॅब्रिकेशन, एरोडायनॅमिक्स आणि स्थैर्य विश्लेषण, पिक्सहॉक फ्लाइट कंट्रोलर प्रणाली, आरटीके-जीपीएस आधारित नेव्हिगेशन, इलेक्ट्रिक प्रोपल्शन सिस्टीम, फ्लाइट टेस्टिंग, रिमोट पायलटिंग, स्ट्रक्चरल व्हॅलिडेशन आणि प्रोपल्शन ऑप्टिमायझेशन ही सर्व कामे स्वतंत्रपणे पार पाडली.

या यशाबद्दल बोलताना प्रा. डॉ. मंगेश कराड म्हणाले, प्रोजेक्ट गरुडा हे अनुभवाधारित आणि नवोन्मेषप्रधान शिक्षणाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. विद्यार्थ्यांनी वर्गातील ज्ञानाचा वापर करून संशोधन, चिकाटी आणि संघभावनेच्या जोरावर राष्ट्रीय पातळीवरील एरोस्पेस क्षेत्रातील मोठी कामगिरी साध्य केली आहे. अशा प्रकल्पांमधून भारताचे भावी एरोस्पेस तज्ज्ञ आणि संशोधक घडतील, अशी आम्हाला आशा आहे. त्यामुळेच विद्यार्थ्यांच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला विद्यापीठाने आवश्यक ती मदत पुरवून त्यांचा आत्मविश्वास वाढविला आहे.

# कोंढव्यात दोन मुलांच्या भांडणातून तणाव; दगडफेक, पोलीस ठाण्यावरही हल्ला

पुणे । प्रतिनिधी

कोंढवा परिसरात दोन लहान मुलांच्या किरकोळ भांडणातून मोठा वाद निर्माण झाल्याची घटना काल समोर आली आहे. या घटनेत मोठ्यांनी हस्तक्षेप केल्यानंतर दोन गट आमनेसामने आले आणि परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. वादाचे रूपांतर दगडफेकीत झाले असून काही जणांकडून कोंढवा पोलीस ठाणे येथेही दगडफेक करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, परिसरातील दोन लहान मुलांमध्ये किरकोळ कारणावरून वाद झाला होता. सुरुवातीला हा वाद स्थानिक पातळीवर मिटवण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, त्यानंतर काही मोठी मंडळी या वादात सहभागी झाल्याने वातावरण अधिक चिघळले. दोन्ही गटांमध्ये जोरदार बाचाबाची झाली आणि काही वेळातच दगडफेक सुरू झाली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मात्र, जमाव आक्रमक झाल्याने काही जणांनी कोंढवा पोलीस ठाण्यावरही दगडफेक केल्याचे सांगितले जात आहे. या प्रकारामुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.घटनेनंतर मोठ्या संख्येने नागरिक पोलीस स्टेशनबाहेर जमा झाले. काही नागरिकांनी रास्ता रोको आंदोलन करत निषेध व्यक्त केला. त्यामुळे परिसरातील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. सध्या परिस्थिती नियंत्रणात असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. तसेच, दगडफेक करणाऱ्यांची ओळख पटवण्याचे काम सुरू असून संबंधितांवर कठोर कारवाई केली जाणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.



# दहावी-बारावी परीक्षा डिजिटल होणार! प्रश्नपत्रिका थेट केंद्रांवर, उत्तरपत्रिका ऑनलाईन

पुणे: दहावी- बारावीच्या येत्या पुरवणी परीक्षेत महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ डिजटल तंत्रज्ञानाचा वापर करणार आहे. त्यानुसार केवळ एका विषयाच्या प्रश्नपत्रिका डिजिटल पद्धतीने थेट परीक्षा केंद्रावर पाठविण्यात येणार आहेत. त्याचबरोबर परीक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिकादेखील डिजीटल पद्धतीने तपासल्या जातील. यातील परिणामांचा अभ्यास करून फेबुवारी-मार्च महिन्यात होणाऱ्या परीक्षेमध्ये त्याचा वापर केला जाणार असल्याची माहिती राज्य मंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, दहावी-बारावीच्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिका राज्य मंडळाच्या प्रचलित पद्धतीने ऑफलाईन देण्यात येत होत्या. तसेच उत्तरपत्रिकादेखील ऑफलाईनच तपासल्या जात होत्या. परंतु, आता या प्रश्नपत्रिका डिजीटल पद्धतीने थेट केंद्रांवर पाठविण्यात येणार आहेत. त्यासाठीची यंत्रणा राज्य मंडळाकडून विकसित करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर परीक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिका स्कॅन केल्या जातील आणि ऑनस्क्रीन मार्किंगसाठी शिक्षकांकडे जातील तसेच यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात



‘एआय’ची देखील मदत घेता येईल का, याचीही प्रायोगिक स्तरावर चाचपणी केली जाणार आहे. सध्या अशा प्रकारचे प्रयोग काही प्रमाणात विविध विद्यापीठांमध्ये केले जात आहेत. परंतु राज्य मंडळाच्या स्तरावर अशा प्रकारचा प्रयोग पहिल्यांदाच करण्यात येणार आहे. परीक्षेच्या काळात अनेक शैक्षणिक संस्था इमारती देण्यासाठी नकार देतात, मनुष्यबळ मिळत नाही, वाहने मिळण्यास अडचणी येतात. त्यामुळे ज्या पद्धतीने निवडणुकांच्या काळात जिल्हाधिकाऱ्यांना संबंधित गोष्टी ताब्यात घेण्याचा अधिकार आहे. त्याच धर्तीवर परीक्षेच्या काळात राज्य मंडळाचे अध्यक्ष किंवा परीक्षा परिषदेला संबंधित अधिकार देण्यात यावेत, असा प्रस्ताव शासनाला पाठविण्यात येणार आहे. संबंधित प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर एका ठराविक काळात परीक्षा पार पाडण्यासाठी आता कोणतीही अडचण राहणार नसल्याचे देखील अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. याअगोदर दहावी- बारावीच्या प्रश्नपत्रिकांच्या बाबतीत काही गैरप्रकार झाल्यास त्याची तीवता पाहून थेट गुन्हे दाखल करण्यात येत होते. परंतु उत्तरपत्रिकांच्या बाबतीत अशी काही तरतूद नव्हती त्याचा गैरफायदा घेऊन उत्तरपत्रिका कोणाकडून तपासून घेणे, त्या कुठेही घेऊन जाणे असले प्रकार घडताना दिसत होते; परंतु यापुढे प्रश्नपत्रिकांएवढेच महत्त्व उत्तरपत्रिकांना देण्यात येणार असून, उत्तरपत्रिकांबरोबर छेडछाड केल्यास थेट गुन्हा दाखल केला जाणार आहे. तशा प्रकारचा प्रस्ताव राज्य मंडळ शासनाला पाठवणार आहे.

# नीट पेपरफुटीचे महापालिकेत तीव्र पडसाद!

## प्राध्यापिकेच्या अटकेनंतर काँग्रेस-राष्ट्रवादी आक्रमक

पुणे । प्रतिनिधी

वैद्यकीय प्रवेशासाठीच्या नीट परीक्षेतील पेपरफुटी प्रकरणाचे धागेदोरे पुण्यातही असल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले आहे. या पोलीस या प्रकरणात प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न महाविद्यालयाच्या प्राध्यापिका मनीषा मांढरे यांना अटक झाल्यानंतर महाविद्यालयाची मान्यता रद्द करावी तसेच महाविद्यालयाचे संचालक मंडळ बरखास्त करून त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नगरसेवकांनी महापालिकेच्या सभागृहात केली.

तसेच, राज्यशासन आणि केंद्र शासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजीही केली. मात्र, महापालिकेत एकहाती सत्ता असलेल्या भाजपच्या एक-दोन नगरसेवकांव्यतिरिक्त कोणत्याही नगरसेवकांनी या आंदोलनाला विरोध केला नाही. या उलट भाजपचे पदाधिकारी




बचावात्मक पवित्रा घेत असल्याचे दिसून आले. सर्वसाधारण सभा सुरू होताच काँग्रेसचे गटनेते ड. चंदूशेठ कदम आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे गटनेते काकासाहेब चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली नगरसेवकांनी महापौरांसमोरील जागेत येऊन घोषणाबाजी केली. तसेच, महाविद्यालयावर कारवाई करण्याची मागणी केली. यावेळी सभागृह नेते गणेश बिडकर यांनी हा विषय केंद्र सरकार आणि तपास यंत्रणांशी संबंधित असल्याचे सांगितले. मात्र, त्यानंतरही काँग्रेसच्या नगरसेवकांनी या घटनेच्या निषेधार्थ सभा तहकुबी मांडली. सभागृह नेते गणेश बिडकर यांनी त्यास विरोध केला. त्यानंतर, या तहकुबीवर नगरसचिव योगिता भोसले यांनी मतदान पुकारले. त्यात, सभा तहकुबीसाठीसाठी १८ नगरसेवकांनी अनुकूल मतदान केले तर ११८ नगरसेवकांनी तहकुबीच्या विरोधात मतदान केल्याने ही तहकूबी फेटाळण्यात आली.

# पुण्यातील सोसायटीत लिफ्टमध्ये अडकून ७ वर्षांच्या शिवांशचा अंत

पुणे । प्रतिनिधी

पुणे शहरातील एका प्रसिद्ध परिसरातील सोसायटीमध्ये सोमवारी रात्री एक अत्यंत धक्कादायक



आणि हृदयद्रावक घटना घडली आहे. खेळता खेळता लिफ्टमध्ये गेलेल्या एका चिमुकल्याचा लिफ्टमध्ये अडकून दुर्दैवी मृत्यू झाला असून या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

पुण्यातील सिंहगड रोड परिसरातील निम्बजनगर येथील रिद्धी सिद्धी अपार्टमेंटमध्ये ही घटना घडली. शिवांश शैलेश धूत असे या ७ वर्षीय मृत मुलाचे नाव आहे. शिवांश रात्री १० च्या सुमारास सोसायटीच्या परिसरात इतर मुलांसोबत खेळत होता. खेळता खेळता तो अचानक लिफ्टमध्ये गेला. त्याने लिफ्टमधील बटण दाबले आणि लिफ्ट सुरू झाली, मात्र दुसऱ्या मजल्यावर पोहोचण्यापूर्वीच लिफ्ट अचानक मध्येच अडकली. शिवांश बराच वेळ बाहेर न आल्याने आणि तो कोठेही दिसत नसल्याने सोसायटीतील रहिवाशांना संशय आला.रात्री साडेअकराच्या सुमारास या घटनेची माहिती पोलीस आणि अग्निशमन दलाला देण्यात आली. माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी मोठ्या प्रयत्नांनंतर लिफ्टमधून शिवांशला बाहेर काढले, मात्र तोपर्यंत उशीर झाला होता आणि त्याचा मृत्यू झाला होता. अवघ्या ७ वर्षांच्या चिमुकल्याचा असा अंत झाल्याने परिसरात मोठी हळहळ व्यक्त होत आहे. या घटनेनंतर पोलिसांनी प्राथमिक तपास सुरू केला असून लिफ्टमध्ये कोणताही मोठा तांत्रिक बिघाड प्राथमिक तपासात आढळून आलेला नाही. संबंधित लिफ्टची नियमित देखभाल सोसायटीमार्फत केली जात असल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे हा अपघात नेमका कसा झाला, याबाबत आता प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.या प्रकरणी सिंहगड रोड पोलिसांनी सध्या अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनय पाटणकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस या घटनेचा सर्व बाजूंनी तपास करत आहेत. या घटनेनंतर लिफ्टच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून पालकांमध्ये काळजीचं वातावरण आहे.

# पाटील इस्टेटमध्ये तुफान राडा; गाड्यांची तोडफोड, परिसरात तणाव

पुणे शहरातील पाटील इस्टेट परिसरात रविवारी रात्री दोन गटांमध्ये झालेल्या वादाचे रूपांतर तुफान राड्यात झाले. या घटनेत काही वाहनांची मोठ्या प्रमाणात तोडफोड करण्यात आली असून परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, किरकोळ कारणावरून सुरू झालेला वाद अचानक उग्र झाला. दोन्ही गटातील तरुणांनी एकमेकांवर दगडफेक करत परिसरात उभ्या असलेल्या दुचाकी आणि चारचाकी वाहनांचे नुकसान केले. काही वाहनांच्या काचा फोडण्यात आल्या, तर रस्त्यावर मोठा गोंधळ निर्माण झाला.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. पोलिसांच्या हस्तक्षेपानंतर जमाव पांगवण्यात



आला. या प्रकरणी संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींची ओळख पटवली जात आहे.

दरम्यान, या घटनेमुळे पाटील इस्टेट परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे.

# पुरंदरमध्ये मोठी कारवाई ; २८ लाखांचा चंदनसाठा जप्त

पुणे : ग्रामीण दहशतवाद विरोधी पथकाने पुरंदर तालुक्यातील (झींपश छशुी) मांडकी येथे धडक कारवाई करत तब्बल ५६० किलो चंदन साठा जप्त केला. या कारवाईत अंदाजे २८ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

मांडकी येथील एका शेतामध्ये हिरव्या कापडाखाली लपवून ठेवलेले (झींपश छशुी) चंदनाचे ओंडके, बॅटरीवर चालणारा कटर व दोन लोखंडी ड्रिल पोलिसांना आढळून आले. हा साठा चोरीचा असून विक्रीसाठी ठेवण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणी प्रतिक प्रमोद खुंटे (रा. मांडकी, ता. पुरंदर) याच्याविरुद्ध जेजुरी पोलीस ठाण्यात बीएनएस कलम ३०३(२), भारतीय वन अधिनियम



तसेच महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी फरार असून त्याचा शोध सुरू आहे. ही कारवाई पुणे जिल्हा पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, बारामती अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार व जेजुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

दहशतवाद विरोधी पथकाचे (झींपश छशुी) सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रकाश पवार, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक महेश गायकवाड, विशाल गव्हाणे, पोलीस हवालदार निलेश कदम, रविंद्र जाधव, पोलीस अंमलदार मोसीन शेख, ओंकार शिंदे, जालिंदर मुळीक तसेच जेजुरी पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक केशव जगताप यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वी केली.

# ५वी-८वी शिष्यवृत्ती परीक्षा निकाल जाहीर! अंतरिम निकाल ऑनलाइन उपलब्ध

पुणे: महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेतलेल्या पाचवी, आठवी या शिष्यवृत्ती परीक्षांचा अंतरिम निकाल जाहीर केला आहे. शाळांना निकाल शाळा लॉगिनमधून, तर पालकांना संकेतस्थळाद्वारे निकाल पाहता येणार असल्याची माहिती राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी दिली आहे.

विद्यार्थ्यांना गुणपडताळणी करून घ्यायची असल्यास संबंधित शाळांच्या लॉगिनमध्ये २७ मेपर्यंत ऑनलाइन अर्ज उपलब्ध करून देण्यात येत आहे. विद्यार्थ्याचे नाव, आडनाव, वडिलांचे नाव, आईचे नाव इत्यादीमध्ये दुरुस्ती करण्यासाठी २७ मेपर्यंत संबंधित शाळेच्या लॉगिनमध्ये ऑनलाइन उपलब्ध केला आहे. ऑनलाइन व्यतिरिक्त अन्य कोणत्याही पद्धतीने अर्ज पाठवल्यास त्याचा स्वीकार केला जाणार नाही. तसेच मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. शाळा माहिती प्रपत्रात शाळेचे क्षेत्र (शहरी, ग्रामीण), अभ्यासक्रमात दुरुस्ती करायची असल्यास शाळा मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीचे




विनंतीपत्र पूर्ण माहिती नमूद करून ईमेलद्वारे २७ मेपर्यंत पाठवण्याचे आवाहन केले आहे.

दिलेल्या मुदतीत आवश्यक शुल्कासह प्राप्त झालेल्या ऑनलाइन अर्जानुसार गुणपडताळणीचा निर्णय शाळेच्या लॉगिनमध्ये ३० दिवसांत कळवण्यात येईल. दिलेल्या मुदतीत ऑनलाइन पद्धतीने आलेले गुणपडताळणी अर्ज निकाली काढल्यानंतर अंतिम निकाल, गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. अधिक माहिती या संकेतस्थळावर दिली आहे.यंदा पाचवीच्या ६ लाख ५७ हजार १७० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ९६.६१ टक्के, म्हणजेच ६ लाख ३४ हजार ९२० विद्यार्थी परीक्षेला उपस्थित होते, तर आठवीच्या ३ लाख ८७ हजार ६२३ विद्यार्थ्यांपैकी ३ लाख ७३ हजार ९३१ विद्यार्थ्यांनी (९६.४७ टक्के) परीक्षा दिली होती. दोन्ही इयत्ताच्या १० लाख ८ हजार ८५१ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षा दिली असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# इन्स्टाग्रामवरील मैत्रीचा सापळा! इंडोनेशियातून पार्सल’च्या बहाण्याने सव्वा सात लाखांचा गंडा

पुणे । प्रतिनिधी

इन्स्टाग्रामवर झालेली ओळख आणि परदेशातून पार्सल पाठवल्याचे आमिष दाखवत हडपसरमधील ४० वर्षीय महिलेची तब्बल ७ लाख १५ हजार रुपयांची सायबर फसवणूक करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी पुणे शहर सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी तपास सुरू केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मीनल विलास साळवे (रा. हांडेवाडी रोड, हडपसर) यांची इन्स्टाग्रामवर लेक्स नावाच्या व्यक्तीशी ओळख झाली होती.

त्यानंतर दोघांमध्ये व्हॉट्सपवर नियमित चॅटिंग आणि कॉल सुरू होते. काही दिवसांनी आरोपीने इंडोनेशियातून महिलेसाठी पार्सल पाठवल्याचे सांगितले. त्यानंतर स्वतःला दिल्ली कस्टम विभागातील अधिकारी ज्युतसोई म्हणून सांगणाऱ्या महिलेने फिर्यादीशी संपर्क साधला. संबंधित पार्सल भारतात आले असून, त्यासाठी कस्टम शुल्क भरावे लागेल, असे सांगण्यात आले. सुरुवातीला ६० हजार रुपयांची मागणी करण्यात आली. मात्र, फिर्यादीने पैसे नसल्याचे सांगितल्यानंतर ती



रक्कम ४३ हजारांवर आणण्यात आली. यानंतर फिर्यादीने फोनपे आणि नंतर एनईएफटीद्वारे आरोपींनी दिलेल्या खात्यांवर पैसे पाठवले. आरोपींनी पार्सलमध्ये कपडे, दागिने आणि डॉलरमध्ये मोठी रोख रक्कम असल्याचे सांगून ती भारतीय चलनात रूपांतरित करण्यासाठी आणखी पैसे भरण्याचा दबाव टाकला. याप्रकारे फिर्यादीकडून एकूण ७ लाख १५ हजार रुपये उकळण्यात आले.

पैसे भरल्यानंतर संबंधित कस्टम अधिकारी आणि लेक्स यांचे फोन बंद लागल्याने आपली फसवणूक झाल्याचे महिलेच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी तातडीने १९३० या सायबर हेल्पलाईनवर संपर्क साधून, ऑनलाइन तक्रार नोंदवली. या प्रकरणी सायबर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सायबर पोलिसांनी संबंधित बँक खातेधारक, मोबाईल नंबर आणि व्यवहारांचा तपास सुरू केला असून, नागरिकांनी सोशल मीडियावरील अनोळखी व्यक्तींवर विश्वास ठेवू नये, तसेच ‘परदेशातून गिफ्ट/पार्सल’च्या नावाखाली पैसे मागितल्यास सतर्क राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

cmyk